
२९ एप्रिल १९६७
चाळीस पैसे

# माणूस





# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

चतुर्थ आवृत्ती, सचित्र

प्रसिद्धिनंतर : मूल्य रुपये
चाळीस किमान

प्रसिद्धिपूर्व : मूल्य रुपये
सत्तावीस फक्त

पोस्टखर्च : तीन रुपये वेगळा

प्रसिद्धिपूर्व ग्राहक नोंदणीची
अखेरची मुदत : ३१ मे १९६७

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २




## एक समग्र साप्ताहिक


वर्ष : सहावे
अंक : त्रेचाळीसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५९


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्र मैत्री

स. न. एप्रिल १५

आपल्या 'माणूस' साप्ताहिकातून 'उर्दूवार्ता' म्हणून काही मजकूर प्रत्येक अंकातून छापला जातो. उर्दूमधून जी साप्ताहिके, दैनिके व नियतकालिके निरनिराळ्या सामाजिक, धार्मिक व राजकीय प्रश्नांवर मतप्रदर्शन करीत असतात त्यांचे यथातथ्य प्रतिबिंब 'माणूस'-मधील वार्तांतून उमटत नाही. भारतीय मुसलमानांचे मत, त्यांची विचार करण्याची पद्धत, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांच्या तक्रारी वाचकांना कळाव्या ही आपली भूमिका असेल, असे मी गृहीत धरून चालतो.

**आर. डी. देशपांडे**
वजीराबाद, नांदेड.

स. न. एप्रिल १४

आपला 'माणूस'चा ४० वा व ४१ वा अंक पाहिला व अत्यंत निराश झालो. आपण दिलेल्या नीरस कथाच जर वाचायच्या असतील तर अन्य रटाळ अंक चिकार आहेत.

**पु. वि. गोखले**, मुंबई.

स. न. एप्रिल १४

श्री. महादेव मोरे यांची 'भेट' नावाची कथा मनस्वी आवडली. मोरे यांना खूप लिहावयास लावा.

**श्रीपाद तांटके,**
**प्रभाकर किजवडेकर**, मुंबई.

# मार्ग ?

शांत जलाशयावर उठणारे हे हळुवार तरंग !
हा बहरलेला पारिजातक !
ही शुभ्रतेची बरसात !
हे नवखेपण, हा उल्हास, ही आतुरता !
हे सुटेपण, एकटेपण, वेगळेपण !
हा जोश, ही खुशी, हे इशारे !

मी घरून निघालो ती ' प्रीये पहा 'ची पहाटवेळ होती. शेजारच्या वाड्यातील कोंबड्यांनी मला जागं केलं होतं आणि आता निघायच्या वेळी समोरच्या भिंतीवर बसून, डावीकडच्या पत्र्यावरून, त्या मागल्या झाडावरून, दारावरून, चिमण्या मला निरोप देत होत्या. ' लवकर या, जपून जा, सांभाळून राहा ' हे त्यांचे प्रेमळ बजावणे मी दिसेनासा होईपर्यंत चालूच होते.

वारा मंद होता, हवेत गारठा होता, आकाश निरभ्र होते. दिशा उजळत होत्या. पूर्वेकडचा मखमली पडदा अजून वर सरकलेला नव्हता. दूरवर कुठूनतरी रेशीमलडीसारखी उलगडत जाणारी सनईची धून कानांवर आली. इतक्या लवकर! आणि हे तर भैरवीचे सूर ! कोणाची ही निवड ! कसली ही आवड ! या वेळी मला भैरव हवा होता, रामकली चालला असता. भैरवी सदारंजनी असली तरी मला नेहमीच ती कारुण्याने, विरहाने ओथंबलेली वाटत आलेली आहे. हा अपशकुन आत्ता कशाला ! निघताना म्हणा, एका सुवासिनीच्या दर्शनाने अगदी दारातच एक चांगला शकुन घडलेला आहे. फिटंफाट झाली. चला.

# श्री. ग. मा.

मी शीव गाठली तेव्हा अरुणोदय झाला होता. पडदा सरकला होता आणि सूर्यदेवाचा रथ आपल्या अश्वमेघांना सोनेरी शलाकांनी फटकारीत वरवर चढत होता. 'आनाकरथवर्त्मनाम्'– 'ज्यांच्या रथाची धाव थेट स्वर्गापर्यंत होती...... देवासुर युद्धात देवांच्या साहाय्यासाठी ज्यांना आमंत्रिले जाई, एवढा ज्यांच्या पराक्रमाचा लौकिक होता...' रघुकुलातील राजांच्या कविकुलगुरुप्रशस्तीतील एक श्लोकार्ध, एक चरण मला सहज आठवला. रघुराजांचे रथ असेच वर चढत असतील का? का कुणी दिवसाचे दूत पिवळ्या, तांबड्या, केशरी, बदामी, नारिंगी निळ्या रंगांनी आपल्या मुठी भरभरून सूर्य भगवानांच्या स्वागतार्थ उधळीत आहेत! का या त्यांनी ढाळलेल्या रंगीबेरंगी चौऱ्या, की उलगडलेला भरजरी गालिचा! छे: छे: ! हे तर शांतरसाचे कुंभच रिते होत आहेत. त्याशिवाय का हे वस्तुजात असे निवांत पहुडले आहे, निश्चितपणे विसावले आहे! कुणा देवतेच्या माळीचा हा मळवटही असावा. का मानवांना अस्पर्श असणारे स्वर्गोद्यानातील हे तांबडे फळच क्षितिजावर लटकले आहे!

नगर मागे पडले होते. उपनगराच्या रस्त्यावरील वर्दळ वाढली होती. माणसे कामावर निघाली होती. मध्येच एक भोंगा आवाज देऊन गेला. या कारखान्यासमोर ही गर्दी कसली! हो, हो, आठवलं. यांचा संप चालू आहे नाही का! यांचं म्हणजे सगळं कसं शिस्तीत. एक राहुटी टाकलेली आहे. हे लढ्यासाठी उभारलेलं तात्पुरतं कार्यालय असावं! राहुटीच्या आसपास घोळक्याघोळक्याने 'मजदूर' उभे आहेत, टेरेलिनच्या पोशाखातले, बूटमोजे घातलेले. कुजबूज आहे,

आवाज नाही, घोषणा नाही. आणखी पलीकडे 'मजदूरां'पेक्षाही अधिक संख्येने असलेले पोलिस आरामात उभे आहेत. राहुटीवर ध्वज डौलाने फडकतो आहे. (केशरी असल्यामुळे डौल हा अपरिहार्यच.) बाजूला विस्तारलेल्या झोपडपट्टीवर एक-दोन हिरवी, चार-पाच तांबडी निशाणे चढली आहेत. कारखान्याच्या मुख्य इमारतीवरही एक नेव्ही कलरचा फ्लॅग फडकत आहे.

माळरानावर लमाणांचा तांडा असला की वस्तीसमोर वेगवेगळ्या रंगांची निशाणे एकत्र जमिनीत रोवलेली दिसतात. पूर्वी एकमेकांशी शत्रुत्व करणाऱ्या टोळ्या कालांतराने एक झाल्या, एकत्र नांदू लागल्या तरी आपले पूर्वीचे वेगळेपण त्यांनी वेगवेगळ्या निशाणांच्या रूपाने जतन करून ठेवले असावे. अभिमानस्थानेही जपायची. पण व्यापक हितासाठी कालबाह्य ठरलेल्या अभिमानांचा, अस्मितेचा लयही करायचा हाच मानवी ऐक्याचा राजमार्ग आहे का! शस्त्रानेही,—एकाने दुसऱ्याचा पूर्ण निःपात करण्याच्या मार्गानेही—मानवी ऐक्याची वाढ झालेली आहे. ख्रिस्ती धर्माने, महंमदी धर्माने प्रस्थापित केलेले ऐक्य या प्रकारचे आहे, असे इतिहास सांगतो. परिस्थितिवशात् भारतात शांततेचा, देवाण-घेवाणीचा, समजुतीचा मार्ग अधिक यशस्वी ठरला असे दिसते. "आम्ही तुमची शिवोपासना घेतो, तुमच्या नागालाही देवत्व देतो, तुम्ही आमचे वेदग्रंथ घ्या," अशा भाषेत प्राचीन भारतातील भिन्नभिन्न समाज आणि वंश एकमेकांशी बोलले असावेत असे वाटते. अशाने विविधताही स्वातंत्र्य टिकले नांदली, एकताही निर्माण झाली, रक्तपात कमी घडला. यामुळे ऐक्य दुबळे राहिले, परकीय आक्रमणांना हा समाज वेळोवेळी बळी पडला हे खरे; पण युरोपातही हजार—हजार वर्षांची अंधःकारयुगे होतीच की नाही? शंभर टक्के आदर्श मार्ग अद्याप कुणालातरी कुठेतरी सापडला आहे का! व्यक्तीप्रमाणे समाजाचेही स्वभाव असतात. ते ओळखूनच सुधारणेचा पुढचा मार्ग ठरवावा लागतो.

या वेगवेगळ्या रंगांच्या निशाणांनाही, त्यामागील भिन्नभिन्न आर्थिक, राजकीय संप्रदायांनाही भारतीय स्वभावापुढे नमावे लागणार आहे. चवथ्या सार्वत्रिक निवडणुकांनी भारतीय मानसाची ही ठेवण व्यक्त केलीच आहे. आता हवे आहे या मानसाचा अचूक तळ गाठू शकणारे एक संप्रदायातीत नवे नेतृत्व! नवा गांधी, नवा टिळक! हे नवे नेतृत्व आपल्या बुद्धिबळावर दक्षिणेकडून उत्तरेकडे संचार करीत निघणार आहे, की उत्तरेच्या भावबळाचा दक्षिणेवर प्रभाव पडणार आहे, की या सह्याद्रीच्या कुशीतच बुद्धी आणि भावना यांचा मेळ साधणारे, उत्तरेला आणि दक्षिणेला आपल्या विवेकनिष्ठ विक्रमाने आकर्षित करणारे नवे नेतृत्व उदयास येणार आहे हे काळच ठरवील. पण कोणी कुठूनही येवो, एक गोष्ट निश्चित आहे. या नव्या नेतृत्वाचे स्वरूप केवळ राजकीय असून चालणार नाही. केवळ

सत्तेच्या राजकारणात रमलेली व्यक्ती, केवळ मुत्सद्दी भारतीय मानसाला आवाहन करू शकत नाही. विक्रमाला वैराग्याची जोड हवी, अशी अपेक्षा बाळगणारे हे मन आहे. भौतिकतेचा विचार करतानाही आध्यात्मिक विकासाचे अनुसंधान बाळगणारी या भूमीची परंपरा आहे. जो अभ्युदय सांगतो आणि निःश्रेयसाचाही मार्ग दाखवतो तोच धर्म. तीच धारणा. महत्त्व आहे जोडकामाचे, योगाचे. नुसता अभ्युदय, नुसते निःश्रेयस चालणार नाही. "प्रथम ते हरिकथानिरूपण ! दुसरे ते राजकारण." हरिचरण हीच अखेरची निष्ठा, परमधाम अटळ, अनिवार्य साधन म्हणून राजकारण...राजसत्तेचा सामाजिक उन्नतीसाठी वापर, सत्ताभोग नव्हे.

रहदारी वाढत चालली. ट्रक्स बेगमान धावत होत्या. दोन बैलांना ठार करून रस्त्याच्या कडेला एखाद्या मख्ख गुन्हेगारासारखा उभा असलेला एक ट्रक ! पंचनामा चालू होता. एवढे मोठे प्राणी रक्ताचा थेंबही न सांडता मरून पडलेले यापूर्वी फक्त फोटोतच पाहिले होते-दुष्काळाच्या. बैलांच्या मालकाला काय वाटत असेल ! आपल्याला तर काहीच वाटलेले नाही. आपला आणि या प्राण्यांचा क्षणाचाही सहवास नाही. 'चोरून दूध पिणारा वाड्यातला बोका नाहीसा झाला तरी यांपेक्षा अधिक जाणवेल. कधीही न पाहिलेल्या, जगातल्या कुठल्याही कोपऱ्यातल्या लहान मुलाचे बरीक काही वाईट झाल्याचे कळले तर मात्र आपले काळीज हलते. दोन वर्षांपूर्वी भारतात दुष्काळ पडला होता. वर्तमानपत्रात आलं होतं, की हॉलंडमधल्या बालकांनी म्हणे एक दिवस उपवास केला, अन्नाची बचत केली आणि हे अन्न भारतातील दुष्काळपीडितांसाठी पाठवून दिले. या दिवसभर उपाशी राहिलेल्या बालकांचे चेहरे कित्येक दिवस आपल्या डोळ्यांसमोरून हलले नाहीत. आणि असा मुलांच्या तोंडचा घासही स्वीकारणाऱ्या आपल्या कोडग्या नेतृत्वाचाही संताप वाटला. एक जहाज भरून चॉकलेटे या हॉलंडच्या बालकांना पाठवून द्यावीत असे अजूनही कितीदातरी मनात येतं आपल्या !

मोटारी अंगावरून भरधाव निघून जात होत्या. आतील व्यक्ती मागील काचेतून, दारातून वळून मागे पाहताहेत असे खूप वेळा झाले. मी नुसता हात वर करायचा अवकाश होता, की कोणीही थांबून मला आत घेता. कारण माझा पोषाख आधुनिक होता, कुतूहल जागे करणारी माझी एकाकी चाल होती. पण माझी अडचण वेगळीच होती. एखाद्याने थांबून चला म्हटले तर नको कसे म्हणायचे ! ठिकाण ठरलेले नाही, चालत का निघालो याचे उत्तर नाही. सांगायचे काय ! संभाषण कदाचित् इंग्रजीतही होईल. मराठीत झाले तर निदान एवढे तरी

सांगता येईल, ' थोडा पदयात्रेचा अनुभव घेतो आहे.' इंग्रजीत 'पदयात्रे'ला प्रतिशब्द कोणता वापरायचा ! स्मरणशक्तीला खूप ताण दिला. प्रतिशब्दच नाही! गांधीजींच्या 'दांडी यात्रे' चे भाषांतर इंग्रजीत 'दांडी मार्च' असे झाले. विनोबांच्या पदयात्रेलाही 'भूदान मार्च' असे संबोधिले जाते. 'मार्च' वगळा, पदयात्रा वेगळी. 'मार्च' शब्दप्रयोगामागे थोडा आक्रमकभाव आहे. विशिष्ट उद्दिष्ट गृहीत धरण्यात आलेले आहे. आपल्याला यातले काहीच लागू नाही. 'पिल्ग्रिमेज' शब्दही चुकीचा. कारण त्यामागे फक्त धार्मिक भावना आहे. कोणी थांबून आपल्याला विचारत नाही' हेच तूर्त ठीक आहे.

ओहो ! दुतर्फा लांबपर्यंत उभ्या असलेल्या वटवृक्षांनी एकमेकांत फांद्यांचे हात गुंतवून केवढी छान कमान टाकली आहे समोर ! आपल्या स्वागतासाठी तर नाही ! स्वागत ! आणि ते कशासाठी बुवा ! तू थोडंतरी वेगळं करतो आहेस नं ! हौशीने, आवडीने, कुणालाही न सांगता, प्रदर्शन न मांडता ! म्हणून हे स्वागत असेल. आजच्या गर्दीत माणूस आपला सारा वेगळेपणाच हरवून बसला आहे. चौकोनात नांदण्यासाठी कोण अहमहमिका ! अंतःस्फूर्तीचा, स्वयंप्रेरणेचा, स्वाभाविक प्रवृत्तींचा किती कोंडमारा ! ज्याची जशी माती तसा त्याने घाट घ्यावा हे आज कुणाला मान्यच नाही ! साऱ्यांना एकच घाट देण्याच्या योजना ! एकाच घाटात बसण्याची सगळ्यांची धडपड ! तू तुझा घाट शोधून काढू पाहतोस नं ! त्यासाठी हे स्वागत! जो जो जिथे जिथे असा आपल्या अंतराशी द्रोह करण्याचे नाकारीत असेल, आपल्या अंतःशक्तीच्या विकासासाठी झटत असेल, 'स्वधर्माच्या शोधा'त मग्न असेल, मुक्तीसाठी, मोकळे होण्यासाठी, स्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील असेल त्याच्या त्याच्या स्वागतासाठी, तिथे तिथे निसर्गाने अशा कमानी उभारलेल्याच आहेत. निसर्ग हा नियमांनी बांधला गेला असल्याने त्याला मुक्ती नाही. निदान मानवाने तरी या सौख्याला पारखे होऊ नये, हे भाग्य अव्हेरू नये, असे त्याला किती मनापासून वाटते आहे ! यासाठी तर तो नियमांच्या बंधनात जखडलेला असूनही रोज नवीन नवीन रूपे धारण करतो, ठायी ठायी वेगवेगळा प्रकट होतो ! 'मला मुक्ती नाही. मानवा, तू तरी मुक्त हो ! तू तरी स्वतंत्र हो!' हा त्याचा सांगावा घेऊनच तर हे पक्षीगण येथे आलेले नसतील ! केवढा हा कोलाहल ! आणि एवढ्या दाट पर्णराशीतून मार्ग हुडकीत आलेली ही सूर्यकिरणे मला अभयदान करण्यासाठी तर आसुलेसली नसतील ! हे सोनेरी हात मला काय आशीर्वाद देत आहेत ! कसले आश्वासन देत आहेत ! कोणता मार्ग दाखवीत आहेत !

•

# मालेवाडी व भाजे प्रकल्प

मालेवाडी हे मावळ तालुक्यातील छोटेसे खेडे. विसापूर किल्ला व भातरास या दोन डोंगरामध्ये ३००० फूट उंचीवर वसलेले गाव आहे. मळवली स्टेशनपासून ४॥ मैल चढण चढून तेथे जावे लागते.

मालेवाडीची लोकवस्ती सुमारे दीडशे. त्यांना पाण्याचा साठा फक्त ८ महिने पुरतो. फेब्रुवारीनंतर त्यांच्या पाण्याचा तलाव ठणठणीत कोरडा पडतो म्हणून हे सर्व लोक मालेवाडीतून गुराढोरांसह साडेतीन मैल दूर तागेमाचीला जातात. तेथे चार महिने झाडाखाली करवीचा आडोसा करून राहतात व जूनमध्ये पाऊस पडल्यावर व मालेवाडीला पाणी झाल्यावर परत येतात. दहा दिवसांतल्या ओल्या बाळंतिणीलादेखील भर पावसात भिजत परत यावे लागते.

हे टाळता यावे म्हणून इंजिनियर तज्ज्ञांचा सल्ला घेतला. त्यांच्या मते हा छोटा तलाव ६०'×६०'×१०' आहे. तो ८०' × ८०' × १५' करावा म्हणजे वर्षभर पाणी पुरेल. हे काम करण्यासाठी राष्ट्रसेवा दलाचे २० स्वयंसेवक श्रमदानासाठी २१ एप्रिल ते ३० एप्रिलपर्यंत आले आहेत. मालेवाडीचे गावकरीही स्वयंस्फूर्तीने श्रमदानात भाग घेत आहेत व आलेल्या स्वयंसेवकांना नाचणीची भाकरी व चटणी खाऊ घालीत आहेत.

जवळच असलेल्या भाजेगावीही शेतीच्या पाण्यासाठी असाच एक प्रकल्प योजला आहे. भाज्याचा तलाव गाळाने भरला आहे. त्यातील गाळ उपसला तर किमान दहा एकर जमीन तरी पाण्याखाली भिजणार आहे. हा प्रकल्प शिवजयंतीपासून (दि. ११ मे) सुरू होणार असून तो २८ मेपर्यंत चालेल.

भाजे प्रकल्पात ज्या स्वयंसेवकांना सहभागी व्हायचे असेल त्यांनी खाली दिलेल्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. या प्रकल्पासाठी सुमारे ५० ते ७५ स्वयंसेवकांची आवश्यकता आहे, असे चालक कळवितात.

**श्रीराम चिचलीकर**
**मु. पो. मळवली, ता. मावळ, जि. पुणे**

# या देशाचे काय होणार?

'या देशाच्या भवितव्यात काय लिहिले आहे, कुणास ठाऊक ?' असा सचिंत प्रश्न सध्या विचारवंत व्यक्त करू लागले आहेत. विचारवंतांची ही अस्वस्थता समजण्यासारखी आहे. सर्वच क्षेत्रांत सध्या इतकी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे की पुढील वाटचालीची नेमकी दिशा सांगणे मी मी म्हणणाऱ्यांना कठिण होऊन बसले आहे. अर्थात ही परिस्थिती आजच निर्माण झाली आहे असे नव्हे. गेल्या काही वर्षांतील परिस्थितीचा हा अपरिहार्य परिपाक आहे. १९६२ मध्ये कम्युनिस्ट चीनने आपल्यावर आक्रमण केले आणि त्या आक्रमणाला तोंड देण्याचे आपल्यात सामर्थ्य नाही असे दिसून आले. पं. नेहरूंच्या कारकीर्दीत भारताचे भवितव्य निर्धोक आहे, ह्या १९४७ पासून उराशी बाळगलेल्या समजुतीला पहिला जोराचा धक्का मिळाला हा त्या चिनी आक्रमणाच्या वेळी. आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या दडपणामुळे चीनने त्या वेळी आपण होऊन माघार घेतली म्हणून ठीक. नाही तर त्या वेळीच परिस्थिती किती टोकाला गेली असती व अमेरिकेच्या लष्करी मदतीची दीनवाणी वाट पाहत आपल्याला किती काळ तिष्ठत बसावे लागले असते हे सांगता येत नव्हते.

चिनी आक्रमणाच्या वेळी भंगलेली भारताची प्रतिमा १९६५ च्या पाकिस्तानी आक्रमणाच्या वेळी कै. लालबहादुर शास्त्री यांच्या तडफदार नेतृत्वामुळे पुन्हा सांधली गली आणि हा देश समर्थ नेता मिळाला तर परक्यांशी झुंज देऊ शकतो, आक्रमकांच्या भूमीवर जाऊन त्यांना तडाखा देण्याचा निर्धार करू शकतो हे जगाला दिसून आले. आपल्यातही या घटनेने एकप्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला. ही झाली या घटनेची मानसिक बाजू; परंतु त्यापेक्षाही आपली आर्थिक परिस्थिती फारशी मजबूत नव्हती. पाकिस्तानी आक्रमणाला तोंड देताना आपल्याला आपले परकीय चलन बऱ्याच प्रमाणावर खर्च करावे लागले आणि तेव्हापासून पंचवार्षिक योजनेच्या गाड्याला खीळ बसली. परकीय चलनाचे दुर्भिक्ष्य इतके जाणवू लागले की एकादा क्रीडापटूंचा संघ परदेशी पाठवावा किंवा नाही, याबद्दल सरकारला

विचार करावा लागला. आधीच नियोजनात शेतीऐवजी केवळ अवजड उद्योगधंद्यांवरच भर दिलेला. त्यामुळे औद्योगिक प्रगती होत असताना भाववाढ होत गेली. शेतमालाच्या किंमती स्थिर असल्या तर भावाढीला आळा बसतो आणि या शेतमालाच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी त्याचे पुरेसे उत्पादन व्हावे लागते. परंतु पहिल्या दोन योजनांत तरी शेतीकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले व त्यामुळे महागाईच्या भस्मासुराला आवर घालण्याचे सामर्थ्य निर्माण होऊ शकले नाही.

पाकिस्तानशी युद्ध खेळल्यामुळे अमेरिकेसारखी पाश्चात्त्य राष्ट्रे आपल्यावर नाराज झाली आणि त्यांनी आपल्या लष्करी, आर्थिक आणि अन्नविषयक मदतीचा हात आखडता घेतला. तशातच निसर्गही आपल्याला साथ देईनासा झाला. १९६५ व १९६६ या दोन वर्षांत पुरेशा पावसाच्या अभावी देशात अवर्षण पडले आणि त्यामुळे नागरिकांना दोन वेळा पुरेसे अन्नधान्य पुरविणे हे प्राथमिक कर्तव्यही पार पाडणे सरकारला अवघड वाटू लागले.

या सगळ्या अस्थिर परिस्थितीमुळे जनमानसात आपल्या भवितव्याबद्दल एक प्रकारची असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. साध्या आणि क्षुल्लक कारणांवरूनही दंगली, निदर्शने असले हिंसक प्रकार होऊ लागले; परंतु आपले पोलिसदल कार्यक्षम असल्यामुळे या दंगलींचा लवकर उपशम होई. किंबहुना पोलिसदल म्हणजे विरोधी पक्षांची निदर्शने मारझोडीने मोडून टाकणारी यंत्रणा असेच या दलाचे वर्णन केले जात होते. कायदा आणि सुव्यवस्था राखलीच पाहिजे असे जेव्हा मंत्री जोरजोराने सांगतात तेव्हा त्यांच्या डोळ्यांसमोर आपल्या पोलिसदलाचे सामर्थ्य उभे असते. त्यामुळे दिल्लीतील पोलिसांनी नुकताच जेव्हा बंडाचा झेंडा उभारला तेव्हा साहजिकच सरकारला आश्चर्याचा धक्का बसला. दिल्लीसारख्या केंद्र सरकारच्या राजधानीतील शांतता आणि सुव्यवस्था यांवर देखरेख ठेवणारे पोलिस वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दटावणीला न घाबरता गृहमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर निदर्शनासाठी गेले तेव्हा हा एक अनुभव आहे, असे त्याचे वर्णनकरण्यात आले.

## हुकूमशाहीची चाहूल

या देशाचे पुढे काय होणार ? या प्रश्नाला सध्या जी चालना मिळाली आहे ती पोलिसांच्या संपाच्या संदर्भातच. केंद्रीय गृहमंत्र्यांनी सीमा सुरक्षा दलाची मदत घेऊन या पोलिसी–बंडाचा तात्पुरता उपशम करण्यात यश मिळवले आहे. परंतु ते करताना त्यांना शहरात लष्कर जय्यत ठेवावे लागले होते ही गोष्ट विसरता कामा नये. आतापर्यंत पोलिसदलावर विश्वासून कार्यरत असणारी सरकारी यंत्रणा यापुढे केवळ लष्करावर विसंबून राहणार आहे. ही घटना काही स्वागतार्ह नव्हे. पोलिसदलाने सरकारी धाकदपटशाला न जुमानता बंडाचा झेंडा उभारावा आणि सरकारला शांततारक्षणासाठी सैनिकांना सज्ज राहण्याचे आवाहन द्यावे लागावे ही घटना लोकशाही वाटचालीच्या दृष्टीने शुभसूचक नाही. 'पुढे काय होणार ? ' या प्रश्नामुळे हीच भीती व्यक्त करण्यात आली आहे. अंतर्गत शांततारक्षणासाठी लष्करावर विसंबून राहण्याच्या प्रथेतूनच अखेरीस लष्करशाहीचा जन्म होतो हे गेल्या वीस वर्षांत अनेक आशियाई आणि आफ्रिकी राष्ट्रांच्या उदाहरणांवरून दिसून येते. भारतीय सैन्यदलात राजकीय आकांक्षा असलेली माणसे नाहीत. त्यांचा दृष्टिकोन निव्वळ लष्करी स्वरूपाचा आहे. हे लष्कर परदेशी आक्रमणाशिवाय देशांतर्गत कोणत्याच बाबींकडे लक्ष देण्याच्या मनःस्थितीत नाही. या साऱ्या गोष्टी खऱ्या असल्या तरी या देशाच्या लोकशाही स्वरूपाविषयी ज्यांच्या मनात ममत्व आहे त्यांनी पोलिसांच्या बंडाबाबत आणि त्यामुळे सैन्यावर अवलंबून राहण्याच्या प्रथेबाबत चिंता व्यक्त केली तर त्यात वावगे असे काही नाही.

दिल्लीतील पोलिसांच्या संपामागे काही राजकीय पक्षांचा हात आहे, असे गृहमंत्री श्री. चव्हाण यांनी म्हटले आहे. मला वाटते, 'काही राजकीय पक्ष' असे म्हणताना त्यांच्या डोळ्यांपुढे दोन्ही कम्युनिस्ट पक्ष व संयुक्त समाजवादी पक्ष हे तीन पक्ष असावेत. यांपैकी उजवा काय किंवा डावा काय, कम्युनिस्ट पक्षाबद्दल बोलावयास नको. कारण येनकेन प्रकारेण या भूमीत असंतोषाचे रोपटे लावून ते फोफावते केव्हा व त्या रोपट्याचा वृक्ष होऊन त्याखाली या देशातील नवजात लोकशाहीची कोमललता खुरटते केव्हा याची कम्युनिस्टांनी वाट पाहत बसणे स्वाभाविक आहे. परंतु अशी देशविघातक प्रवृत्ती संयुक्त समाजवादी पक्षाने जोपासता कामा नये. कारण आपणही कोठे तरी राज्यकर्ते आहोत व तेथे असा उपद्रव निर्माण झाला तर त्याचा उपशम करणे जड जाईल हे या पक्षाने ध्यानात ठेवावे, असा जो श्री. चव्हाण यांनी या पक्षाला उपदेश केला आहे तो हाच दृष्टिकोन मनात बाळगून. परंतु आज तरी या पक्षाचे नेतृत्व कोणताही विधायक विचार करण्याऐवजी त्रास देण्याचे आपले बळ (Nuisance value) कसे वाढेल याचाच विचार करण्यात मशगुल झालेले दिसते. एरवी काँग्रेसच्या एकछत्री साम्राज्याला सुरुंग लागत असताना देशातील राष्ट्रवादी पक्षांची जूट करण्याच्या कार्यात हा पक्ष आघाडीवर राहिला असता. याउलट तो

कम्युनिस्टांच्या कच्छपी लागल्याचे दिसत आहे. संयुक्त समाजवादी पक्ष आणि उजवा कम्युनिस्ट पक्ष यांच्यामध्ये आता फक्त झिरझिरीत पडदाच तेवढा बाकी राहिला आहे असे जे राजधानीत म्हटले जाते, ते संयुक्त समाजवादी पक्षाच्या या धोरणामुळे ! परंतु ही टीका विचारात घेण्याच्या मनःस्थितीत संयुक्त समाजवादी पक्षाचे नेते नाहीत, असे दिसून येते. काँग्रेसची प्रतिमा तोडणे एवढाच काय तो सध्या या पक्षाचा कार्यक्रम दिसत आहे आणि या कार्यक्रमात कम्युनिस्टांशिवाय चांगला भागीदार शोधूनही सापडणार नाही.

## आज दिसणारे चित्र

एवढे सारे डोळ्यांसमोर घडत असताना त्यापासून काही धडा घ्यावा अशी सरकार पक्षाचीही तयारी दिसत नाही. निवडणुकीमध्ये मतदारांनी सणसणीत चपराक दिल्यानंतरही काँग्रेस पक्षाचे नेतृत्व बदलल्या परिस्थितीची दखल घेण्याबाबत अगदी मख्ख आहे. भारताचे भूतपूर्व ॲटर्नी जनरल श्री. मोतीलाल सेटलवाड यांच्यासारख्या व्यासंगी विचारवंतानेदेखील याबद्दल खेद व्यक्त केला आहे.

ते म्हणाले की, निवडणुकीच्या वेळी हा देश क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा होता. कारण केंद्र सरकार इतके दुबळे झाले होते की त्यावर विश्वास ठेवून आपल्याला भविष्याबद्दल आशा बाळगावी असे सर्वसामान्य मतदारांस मुळीच वाटत नव्हते. सुदैवाने या अविश्वासास स्फोटक स्वरूप प्राप्त झाले नाही. मतदारांनी शांततेने काँग्रेसच्या भ्रष्टाचाराबाबत आपल्याला किती उबग आला आहे हे दाखवून दिले ! काँग्रेस–नेते वाऱ्याची दिशा बदलली आहे याची दखल घेतील अशी अपेक्षा होती; परंतु प्रधानमंत्र्याच्या निवडणुकीपासून तो मंत्रिमंडळाच्या बनावापर्यंत काँग्रेस पक्षाच्या अंतःस्थ गटबाजीचे एवढ्या मोठ्या प्रमाणावर दर्शन घडविले की हा पक्ष आपली उताराची वाट सोडणार नाही हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती या सर्वोच्च पदांसाठी उमेदवार निवडण्यापूर्वी या पक्षास मतभेदाच्या आणि अंतर्गत कारस्थानाच्या दिव्यातून जावे लागले. काँग्रेस पक्षातील नेतृत्वच केवळ दुभंगले आहे, असे नसून या नेतृत्वावर विशिष्ट हितसंबंधी गटांचा प्रभाव आहे. प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांचे व्यक्तिमत्त्व तर इतके दुबळे आहे की त्यांचे मंत्रिमंडळ एकोप्याने आणि निर्धाराने काही करील असा मुळीच भरंवसा वाटत नाही. ही सर्व परिस्थिती ध्यानात घेता दिल्लीचे काँग्रेस सरकार अल्पवधीतच कोसळले तर आश्चर्य वाटावयास नको.

श्री. सेटलवाड यांच्यासारख्या अपक्ष आणि निःस्पृह व्यक्तीने देशाच्या भवितव्याबाबत बोलताना जी चिंता व्यक्त केली आहे तिचेच पडसाद इतर विचारवंतांशी बोलले की ऐकू येतात. काँग्रेस पक्ष सुधारू शकत नाही आणि या पक्षाची जागा घेऊ शकेल असा पर्यायी पक्ष दृष्टिपथात येत नाही असे हे आजचे चित्र आहे. दिल्लीतील पोलिसांच्या संपामुळे हे चित्र अधिक गडद झाले आहे. या संपामुळे प्रस्था-

पित राज्यसत्तेविरुद्धचा असंतोष किती खोलवर गेलेला आहे व या सत्तेचा वचक कसा नाहीसा होत आहे याचे जसे धवधवीत दर्शन घडले तसेच असंतोषाचा राष्ट्रीय विधायक दृष्टिकोनातून विचार करण्याऐवजी आपल्या पक्षीय स्वार्थासाठी त्याचा वापर करण्याची कम्युनिस्टांची आणि त्यांच्या कच्छपी लागलेल्या संयुक्त समाजवाद्यांची पावलेही स्पष्ट झाली आहेत. हे सर्व पाहिल्यानंतर आजचा दिवस कसा भागवावयाचा या चिंतेने ग्रासलेला सर्वसामान्य नागरिकच नव्हे तर सेटलवाडां सारखा विचारवंतही काळजीयुक्त स्वरांत म्हणतो, " या देशाचं काय होणार आहे कुणास ठाऊक ! "

□

## समस्यांचा काळ

हाँगकाँग येथून निघणाऱ्या ' फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू ' या सुप्रसिद्ध साप्ताहिकाचे संपादक डेरेक डेव्हिस हे नुकतेच हिंदुस्थानातील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी इकडे येऊन गेले. त्यांचे मत :

हिंदुस्थानात सध्या समस्यांचा काळ असल्याने येथे येण्याला ही अनुकूल वेळ नाही. अन्न, परकीय मदत, प्रत्यक्ष योजनेचेच भवितव्य इत्यादी अनेक महत्त्वाचे प्रश्न सध्या धसाला लागले आहेत. त्यांचे नीट उत्तर मिळेपर्यंत येथे पुढे काय घडेल हे सांगणे शक्य नाही.

□

समीर

# विचार वारे

## □ जागतिक संघर्षावर दुहेरी उपाययोजना

जगातला हल्लीचा संघर्ष कमी करण्यासाठी दोन प्रकारची योजना करता येईल एक म्हणजे एका देशाच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी दुसऱ्या देशात मोठ्या संख्येने गेले पाहिजे. आणि दुसरे म्हणजे युनेस्कोसारख्या एखाद्या जागतिक संस्थेच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय शिक्षणाची एकसंध पद्धत तयार करण्यात यावी. पश्चिम जर्मन सरकारच्या माहिती खात्यात सल्लागार म्हणून काम करणारे एक पंडित प्रिन्स लोवेन्स्टीन यांनी थोड्या दिवसांपूर्वी भारताला दिलेल्या भेटीत हे विचार प्रकट केले. त्यांच्या मते या योजनेसाठी लागणारा पैसा एखादा आंतरराष्ट्रीय फंड उभारून किंवा बऱ्याच देशांनी आपसात करार करून गोळा करता येईल. ही योजना कार्यान्वित करण्याची पाहिली पायरी म्हणून भारताने 'कौन्सिल ऑफ युरोप' या युरोपीय संघटनेत असलेल्या २५ देशांशी विद्यार्थ्यांची देवाण–घेवाण सुरू करावी.

लोवेन्स्टीन यांनी दोन प्रचलित प्रश्नांवरही मत-प्रदर्शन केले, ते म्हणजे युरोपियन कॉमन मार्केट व पूर्व-पश्चिम जर्मनीचे परस्पर-संबंध.

युरोपियन कॉमन मार्केटमध्ये शिरण्याचा प्रयत्न हिंदुस्थानला खूपच लाभदायक ठरेल. कॉमन मार्केटच्या प्रदेशात अत्यंत प्रगत अशी ३० कोटी लोकसंख्या आहे, तेव्हा ब्रिटनच्यामार्फत भारताने या प्रदेशांशी संबंध प्रस्थापित केला तर भारताचा निर्यात-व्यापार खूपच वाढू शकेल.

पूर्व जर्मनीने युनायटेड नेशन्सच्या देखरेखीखाली अनिर्बंध निवडणुका घेतल्या तर पश्चिम जर्मनी पूर्व जर्मन सरकारला मान्यता देईल. परंतु "परिस्थिती अशी आहे की, लोकांकडे जाऊन जनतेचा कौल मागण्याचे धैर्यच पूर्व जर्मन सरकारकडे नाही." जर्मन विदेशनीतीत हल्ली एक नवीन प्रकार दिसू लागला आहे, तो म्हणजे अधिकाधिक आशियाई देशांशी राजनैतिक संबंध जोडण्याची आवश्यकता आता जर्मनीला भासू लागली आहे.

## ☐ जगापुढच्या चार समस्या

आज जगापुढे चार समस्या उभ्या आहेत–सामाजिक विषमता, आर्थिक विषमता, वांशिक भेदभाव आणि वसाहतवादाचा वारसा. निरनिराळ्या राजकीय व तात्त्विक विचारपद्धतीमुळे या समस्या निर्माण झाल्या असून त्यांच्यामुळे निर्माण होणारा संघर्ष कमी करण्यासाठी अहर्निश झटणे हे यूनोचे कार्य आहे, असे यूनोचे सरचिटणीस ऊ थांट यांनी नुकत्याच दिलेल्या भारतभेटीत नव्या दिल्लीत इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन या संस्थेच्या सेंटर ऑफ ॲप्लाईड पॉलिटिक्स या अभ्यास-केंद्राचे उद्घाटन करताना उद्गार काढले. गेल्या काही वर्षांत यूनोने जी प्रगती केली आहे आणि सदस्यांच्या संख्येत जी भर पडली आहे ती पाहता यूनो हे जागतिक शांतीचे महत्त्वाचे साधन आहे असे म्हणायला हरकत नाही.

## ☐ आई–वडिलांचे प्रेम नैसर्गिक नसते !

न्यूयॉर्क येथील एका कॉलेजात मानसशास्त्र-विभागाच्या प्रमुख असणाऱ्यां डॉ. इसाबेल टेलर यांनी परवा नव्या दिल्लीत " अधू मुलांच्या मानसशास्त्रीय समस्या " या विषयावर भाषण करताना असा सिद्धान्त मांडला की, आई-वडिलांना मुलाबद्दल वाटणारे प्रेम निसर्गदत्त नसते तर ते शिकावे व जोपासावे लागते ! आई-बाप आपल्या मुलाकडे पाठ फिरवितात. या पाठ फिरवण्याचे आत्यंतिक प्रकार म्हणजे ते त्यांना सोडून देतात. किंवा ठारही मारतात. आई-बापांना मुलाबद्दल वाटणारी अप्रीती अनेक कारणांमुळे निर्माण होऊ शकते–ते आई-वडिलांइतके देखणे नसेल, हुशार नसेल किंवा त्यांना आशा होती तेवढे गुणी नसेल. अशा वेळी आई-वडील मुलाला जी वागणूक देतात तिच्यामागे स्वतःलाच वाटणाऱ्या अपराधी भावनेला दडविण्याचा प्रयत्न असतो; पण मूल ती भावना बरोबर ओळखू शकते.

शरीर निरोगी असेल तरच मन निरोगी असते असे म्हणणे बरोबर नाही; कारण शारीरिक व्यंग असलेली बरीच मुले बुद्धीने तल्लख असल्याचे आढळून येते. या बुद्धीच्या विकासाला वाव देऊन तिचा सामाजिक हितासाठी उपयोग करून घेणे हे समाजाचे कर्तव्य आहे. व्यंग असलेल्या मुलाच्या बाबतीत पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे कुटुंबात त्याचा स्वीकार झाला पाहिजे, व नंतर बाहेरच्या समाजात त्याला इतरांप्रमाणेच मान्यता मिळाली पाहिजे. व्यंग असलेल्या मुलांना आपल्या शारीरिक क्षमतेचा व बुद्धीचा पूर्ण उपयोग करण्याची संधी मिळाली पाहिजे.

डॉ. इसाबेल टेलर यांचे पती प्रा. व्हॅलेस टेलर हेही मानसशास्त्रज्ञ आहेत. ते म्हणाले, व्यंगपूर्ण मुलांचे पुनर्वसन करण्याचे कार्य इतके मोठे आहे की सरकारी साहाय्याशिवाय ते पार पडू शकणार नाही.

## □ 'ऑटोमेशन 'कडून समृद्धीकडे

'ऑटोमेशन 'मुळे बेकारी वाढेल अशी हिंदुस्थानात सर्वत्र वाटणारी भीती अनाठायी आहे, असे एका परदेशी तज्ज्ञाने नुकतेच भारत–भेटीत प्रतिपादन केल्याचे या सदरात दोन-तीन आठवड्यांपूर्वी लिहिले होते. तोच मुद्दा पुनः आवर्जून मांडणारे आणखी एक परदेशी तज्ज्ञ म्हणजे लंडन येथील ' इन्स्टिटयूशन ऑफ इलेक्ट्रॉनिक अँड रेडिओ इंजिनियर्स ' या संस्थेचे अध्यक्ष प्रा. एम्‌रिस विल्यम्स हे होत. इलेक्ट्रॉनिक इंजिनियरिंग या विषयात निष्णात असलेले प्रा. विल्यम्स परवा दिल्लीला भाषण करताना म्हणाले, स्वयंचलित यंत्रे आल्यामुळे बेकारी वाढेल अशी भीती बाळगणे चुकीचे आहे. उलट त्यांच्यामुळे अधिक समृद्धी येईल.

ट्रॅफिक सिग्नलचे उदाहरण घ्या. हे सिग्नल स्वयंचलनाच्या व नियंत्रणाच्या मूलभूत तत्त्वावर आधारलेले असतात. या साध्या यंत्राची कल्पना निघाल्यापासून जग कितीतरी पुढे गेले आहे. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतर करणारे यंत्र, शत्रूचे विमान येत असल्याची माहिती देणारे रडार यंत्र, निरनिराळे कॉम्प्यूटर आणि आता सर्वांत कडी म्हणजे चंद्राची सफर करून येणारे अंतरीक्षयान ही सर्व स्वयंचलित यंत्रे आहेत. एक काळ असा येईल–मात्र अजून तो दूर आहे–की माणूस हातात ट्रान्झिस्टर घेऊन हिंडतो त्याप्रमाणे हातांत मेंदू घेऊ इकडे तिकडे हिंडू शकेल ●

### इंग्लंडमध्ये अपूर्ण ज्ञानाचा काळ

बी. बी. सी च्या परदेशी कार्यक्रमाचे संचालक चार्ल्स क्युटन नुकतेच दिल्लीला आले होते तेव्हा ते म्हणाले :

ब्रिटनमध्ये १९३० च्या आसपासचा काळ हा अज्ञानाचा काळ होता. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र ज्ञानाचा सार्वत्रिक प्रसार बराच झाला व आंता ब्रिटिश जनतेला बाहेरच्या जगाबद्दल बरीच अधिक माहिती आहे. तरीदेखील अजून इंग्लंडमध्ये ' अपूर्ण ज्ञाना 'चा काळ चालू आहे.

## ५ एप्रिल १९२२ रोजी पंडिता रमाबाईंना मृत्यू आला. त्या निमित्ताने या थोर स्त्रीच्या जीवनाची ही ओळख.

**दि. के. बेडेकर**

पंडिता रमाबाईंची (१८५८–१९२२) आठवण मनाला जागे करणारी आहे. रमाबाईंचे चरित्र अद्‌भुत आहे. त्यांची निर्भयता पाहून मन विस्मित होते. अनाथ-अपंगांच्या सेवेचे व्रत ज्या निष्ठेने व कर्तबगारीने त्यांनी चालविले ते पाहून कोणीही नम्र होईल. त्यांची ईश्वरनिष्ठा किती प्रखर होती हे पाहून स्वत:ला धर्मनिष्ठ समजणाऱ्यांनाही लाज वाटेल. त्यांनी आपल्या ज्ञानतपस्येने 'पंडिता' ही मानाची पदवी मिळविली व आमरण ज्ञानाची उपासना केली.

आज सभोवतालचे जीवन अशा काही अंधाराने भारावले आहे की, रमाबाईंच्या नुसत्या आठवणीने या अंधारातही मनाला एक आश्वासन मिळते; प्रकाशाचे दर्शन घडते. रमाबाईंसारखी माणसे अधूनमधून जन्माला येतात व आपल्या सामान्यांच्या नित्यक्रमाच्या आयुष्यात थोडे समाधान, आश्वासन व आशा निर्माण करून जातात.

# पंडिता

# निराधार स्त्रियांची धर्ममाता

रमाबाईंच्या केडगावमधील मुक्तिसदनात आज ७०० निराधार स्त्रिया एका मायेच्या छत्राखाली आहेत. ही सावली त्यांना या धर्ममातेने दिली. या ७०० मध्ये ६० जणी आंधळ्या आहेत; पण त्यांनाही आयुष्याचा मार्ग दिसावा अशी ही सावली आहे. असे मनात येते की, रमाबाईंच्या कार्याकडे पाहताना आमची स्थिती या आंधळ्या स्त्रियांपेक्षाही आंधळी झालेली आहे का ?

मुक्तिसदन ही ख्रिस्ती संस्था आहे. रमाबाई या ब्राह्मण कुळात जन्माला आल्या; पण पुढे ख्रिस्ती झाल्या. त्या कशासाठी ख्रिस्ती झाल्या ? नोकरीच्या लोभासाठी का इतर कोणत्या स्वार्थासाठी ? तसे मुळीच झाले नाही. स्त्रियांची दु:खे पाहून आणि त्या दु:खाचे निवारण करण्यास हिंदू समाज पुढे येत नाहीसे पाहून त्या ख्रिस्ती झाल्या. या दु:खाचा परिहार करण्यासाठीच त्यांनी आमरण कष्ट केले.

एवढेच एक कारण मात्र त्यांच्या धर्मांतराला नव्हते. 'टेस्टिमनी' हे त्यांचे लहानसे आत्मनिवेदनपर पुस्तक आहे. ते वाचताना सारखे जाणवते, की रमाबाईंचे मन ईश्वरविषयक श्रद्धेसाठी आसुसलेले होते. त्यांना मोक्ष नको होता; ईश्वराचे प्रेम हवे होते. ह्या प्रेमाचा अनुभव, साक्षात्कारासारखा गाढ व हृदयसंवादी अशा उत्कटतेने त्यांना आला, याची साक्ष हे पुस्तक वाचताना कोणालाही होईल. ख्रिस्ती धर्मात रमाबाईंना ईश्वराचे प्रेम लाभले व त्यांच्या सेवाव्रताचा अर्थ सापडला. म्हणून त्या ख्रिस्ती झाल्या. कोणताही धार्मिक प्रवृत्तीचा माणूस यासाठी रमाबाईंना दोष देणार नाही. धर्मभावना जर खरी, जिवंत व प्रत्ययालाच मोल देणारी असेल तर ती ईश्वरसाक्षात्काराच्या कोणत्याही प्रत्ययाचे स्वागतच करील.

परंतु, रमाबाईंच्या काळी व आताही आमची धर्मभावना ही धर्मभावनाच

राहिलेली नाही. त्यामुळे रमाबाईंना हिंदू नेत्यांकडून व समाजाकडून अवहेलना सोसावी लागली. धर्मभावना ही जेव्हा राजकारणाची बटीक बनते तेव्हा ती आपल्या मूळ मंगल स्वरूपाला सोडून अमंगल व अघोरी बनते. सर्वच धर्मांच्या बाबतीत हे सर्रास घडत आले आहे. गोव्यामध्ये 'इन्क्विझिशन' चे क्रूर अत्याचार भारतात घडले. तिकडे युरोपमध्येच ख्रिस्ती धर्माच्या नावाने रक्ताचे पाट वाहिले आणि ख्रिस्ती राष्ट्रांनी युरोपच्या बाहेर साऱ्या जगभर जे पाशवी थैमान घातले त्यातही ख्रिस्ताचा संदेश पसरविण्याची दांभिक भाषा त्यांनी वापरलीच. महंमदी धर्मप्रसाराचा इतिहास असाच रक्ताने माखलेला आहे व फाळणीच्या वेळचा धार्मिक रक्तपाताचा इतिहास तर ताजाच आहे.

या साऱ्या अधर्माला धर्म मानण्याची चूक केली, तर मग व्यक्तीच्या मनातील खरी धर्मभावना कळेनाशी होते. मग प्रत्येक धर्मांतर हे राजकीय आणि सामाजिक सत्तेच्या लाभहानीच्या मापाने मोजले जाते. अशी बधिरता हिंदू समाजात धर्मांतराबाबत नव्याने आली व ती स्वसंरक्षणाच्या भीतीतून व ईर्ष्येतून आली. या बधीरतेमुळे धर्मभावनेने होणाऱ्या खऱ्या वैयक्तिक धर्मांतराचा अर्थ आम्हांला उमगेनासा झाला, यात नवल नाही. पण आमचे दुर्दैव दुहेरी होते. हिंदू समाजाच्या चौकटीतच नांदणाऱ्या भयंकर असहिष्णुतेचे रूप ओळखण्याचा डोळसपणा धर्मरक्षणाच्या नव्या ईर्ष्येतूनदेखील आम्हांला लाभला नाही. आणि, जोडीला धर्मभावनेबाबतच आम्ही आंधळे बनलो.

रमाबाईंनी धर्मांतर केले व ख्रिस्ती होऊन निराधार स्त्रियांना व मुलींना आधार दिला. हिंदू समाजाने या वेळी जर आत्मपरीक्षण केले असते तर त्यालाही अशा सेवाकार्याचे महत्त्व कळले असते. अस्पृश्यतेच्या प्रथेमध्ये केवढी क्रूर धार्मिक असाहिष्णुता भरलेली आहे हे कळले असते. ख्रिस्ती व महंमदी धर्मांच्या एकेश्वरी धर्मभावनेत काय सामर्थ्य आहे ते जाणवले असते. हे सारे घडले मात्र नाही. प्रार्थनासमाजाच्या न्यायमूर्ती रानडे प्रभृती नेत्यांनी हिंदू समाजाला जाग आणण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांनी त्यासाठी सर्व जीवन वेचले. पण, आमचा शहरी सुशिक्षित ब्राह्मण जागा झाला नाही व ग्रामीण मराठाही जागा झाला नाही. 'आमचा धर्म सहिष्णू आहे,' असे आम्ही जगाला सांगत बसलो व अस्पृश्य समाजाचा आम्ही सर्वांनीच अंत पाहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मग धर्मांतर केले तेव्हा आम्ही त्यांनाच आग्रही व आततायी ठरवीत बसलो.

रमाबाईंच्या जीवनाचा विचार केला म्हणजे मनाला जाग येते व यावयास हवी, ती या अर्थाने. कवि नारायण वामन टिळक, श्री. र. लु. जोशी यांसारखी माणसे ख्रिस्ती झाली तरी ती महाराष्ट्राची, मराठी भाषेची व भारतीय परंपरेची सेवा करीतच जगली. तशीच गोष्ट अनेक श्रद्धाळू धर्मांतरित व्यक्तींबद्दल झाली. रमाबाईंच्या सेवाव्रताबद्दल तेच म्हणता येईल. या साऱ्या थोर व्यक्तींना आम्ही

दूर ढकलले. आमच्या धर्मभावनेचा कस व जिवंतपणा तपासून पाहण्यासाठी तरी आम्ही त्यांना जवळ करावयास हवे होते.

आज काळ थोडा बदलला आहे ! का हा नुसता भास आहे ? आज धर्मभावनेला राजकीय सत्तेच्या डावपेचात जास्तच ' मोल ' चढले आहे का ? तिला सत्ता-संपादनाच्या लढ्यातले एक अस्त्र म्हणून वापरण्याचे तंत्र आज जास्त प्रगल्भ व फसवे झाले आहे का ! धर्मभावनेला असे साधन व भ्रष्ट लोकक्षोभाचे अस्त्र बनविले जात आहे. अशा अनेक घटना घडत आहेत. राज्य मिळविण्यासाठी व टिकविण्यासाठी कोणकोणत्या साधनांचा वापर करावा याबाबत कौटिल्यांनी सांगून ठेवलेले सारे काही आज वापरले जात आहे; धडाडीने व धूर्ततेने.

पण एकीकडे धर्मभावनेचे हे साधनीकरण व भ्रष्टीकरण चालू असताना, दुसरीकडे आपली मने थोडी सावध झालेली दिसत आहेत. रमाबाईंची आठवण करून त्यांच्या थोरवीचा व कर्तृत्वाचा गौरव आज आपण करीत आहोत. याचा अर्थ हाच घेता येईल की, आमच्या मनाची व हृदयाची दारे थोडी उघडत आहेत. त्यातही अनिच्छा व संकोच कित्येकांच्या हृदयात ठाण मांडून बसलेला अजून दिसेल. पण आर्त सेवेचे, कार्य करण्याबद्दल दिलखुलास आपुलकी व आदर व्यक्त करण्याइतका मोकळेपणा आज आलेला दिसत आहे.

या नव्या उदारतेची जोपासना आपण करीत जाणार का, धर्मभावनेला साधन बनवून सत्तेच्या खेळातच स्वतःला हरवून बसणार, ते कोणी सांगावे ? रमाबाईंचे विशुद्ध, उदार व तेजस्वी जीवन आम्हाला प्रेरणा देते ती अशी की या धर्ममातेच्या उदार करुणेमुळे आमची मनेही उदार व्हावीत व प्रकाशोन्मुख व्हावीत.

●

## पूर्वांचल

मागील अंकातून बिहारची पाच वार्तापत्रे दिली.
या अंकापासून सुरू होत आहे—कहाणी

आसामची—

कामरूपची—

प्रागज्योतीषपूरची—

' माणूस ' प्रतिनिधी

# दीज बास्टर्ड सिल्हेटी बेंगालीज

खास आसामी माणूस मी कधी पाहिला नव्हता. मुंबईत जगाच्या पाठीवरील प्रत्येक कोपऱ्यातील माणूस पाहायला मिळतो; पण एखाद्या आसामी व्यक्तीशी गाठ पडण्याचा प्रसंग मात्र कधी आलाच नव्हता. हेम बरुआ, चालिहा, मेंधी अशी काही नावे ऐकली होती. बरुआंना दुरून पाहिलेही होते. पण ते काही खरे नाही.

त्यामुळे गोहत्तीमध्ये मी मोठ्या अपेक्षेने उतरलो होतो; पण काय झालं होतं कुणास ठाऊक ! ' आसामी ' म्हणविणाऱ्या माणसाची प्रयत्न करूनही गाठ पडेना. ज्या हॉटेलात उतरलो ते निघाले मारवाड्याचे. समोरचा दुकानदार सिंधी निघाला. पुढचा दुकानदार शीख होता. एकाला रस्ता विचारला तर तो " आई यम आल्सो स्ट्रेंजर " असे सांगणारा मद्रासी निघाला. ज्या पत्रकारांकडे गेलो ते बंगाली. गुजराती, बिहारी, केरळी, मराठी, यच्चयावत मंडळी भेटू लागली, पण काही केल्या कुणी आसामी भटेना. साऱ्या आसामी लोकांनी कट केला होता किंवा काय कुणास ठाऊक ! शेवटी वैतागाने मी आसाम प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. शरत्चंद्र सिंहा यांना म्हणालो, " सारे आसामी लोक कुठे आहेत हो ? निदान गोहत्तीत तरी आपणांला आसामी लोक भेटतील, अशी अपेक्षा होती. "

त्यांच्या नावावरून श्री. सिंहादेखील बिगर आसामीच असावेत अशी माझी समजूत झाली होती, पण ती चुकली. थोडेसे उपहासाने हसून श्री. सिंहा एकदम

१



# हे हरामखोर सिल्हेटी बंगाली

उद्गारले, "हेच ते– हेच ते. हीच आम्हा आसामियांची मोठी व्यथा आहे. तुम्हांला आसामच्या प्रश्नांविषयी माहिती हवी आहे ना? मग हीही एक आमची समस्या आहे."

तसे पाहिले तर सारा आसाम प्रदेश हीच एक भारतापुढील मोठी समस्या आहे. आसामात कुठल्याही विषयावर बोलणे काढले की त्यातून राज्याची एखादी नवी समस्या कळते. आसाम राज्याला 'छोटा भारत'–मिनिएचर इंडिया–असे म्हणतात ते सर्वार्थाने खरे आहे. भारताचे भौगोलिक, भाषिक, वांशिक वैविध्य आसामात जसे प्रतिबिंबित झाले आहे, तशाच भारतातील झाडून साऱ्या समस्या आसामात हजेरी लावून आहेत. आणि शिवाय आसाम राज्याच्या काही खास समस्या अशा आहेतच. "आमचे समस्यांचे राज्य आहे– आणि विशेष म्हणजे आमचे दुर्लक्षित राज्य आहे." (We are a problem state and moreover we are a neglected state) हे वाक्य मी आसामात पाच–सहा वेगवेगळ्या पुढाऱ्यांच्या तोंडून जसेच्या तसे ऐकले आहे. या वाक्यातला पहिला भाग शंभर टक्के खरा आहे आणि दुसऱ्याही भागात नाही म्हटले तरी बरेच तथ्य आहे. आसाम हे आज खऱ्या अर्थाने सर्वाधिक कटकटीचे राज्य झाले आहे. आणि त्याच्या भौगोलिक अलगतेमुळे राजकीय दृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या व सांस्कृतिक दृष्ट्या इतर भारतीयांकडून ते थोडेफार दुर्लक्षिलेही गेले आहे.

## 'चेटूक करणारा निसर्ग'

निळे निळे, ठेंगणे ठुसके वाटणारे पण दोन हजारांपासून दहा हजार फुटांच्याही वर चढणारे दक्षिण आसामातील डोंगर. घनदाट बरसणाऱ्या ढगांशी सतत दंगामस्ती करणाऱ्या टेकडया, उत्तर आसामातील नेफामधील हिमालयाची बर्फाच्छादित शिखरे, वेगाने वाहत आजूबाजूच्या-मैदानांना सुजला सुफला करीत जाणाऱ्या ब्रह्मपुत्रेसारख्या नद्या. भाताची हिरवीगार शेते, बांबूची बने, चहाचे मळे, घनदाट जंगले इत्यादी निसर्गाचे सर्व तऱ्हेचे वैचित्र्य आसामात पाहावयास मिळते. रानटी म्हशी आणि हत्तींपासून तो पाणरेड्यांपर्यंत नाना तऱ्हेचे पशू आसामातच दिसतात. निसर्गाने समृद्धीचा वरदहस्त आसामवर ठेवलेला दिसतो.

पण हिवाळयातले काही महिने सोडले तर इथला निसर्ग कधीच शांत नसतो. सतत त्याची दंगामस्ती चालू असते. कधी खेळकरपणे तर कधी रौद्र रूपात. प्रचंड पाऊस, सोसाटयाचे वारे, पूर, धरणीकंप. ब्रह्मपुत्रेच्या पुराची तर सालाबाद भेट ठरलेली.

आणि मानवी वैशिष्टये तरी किती! आसामात जेवढया वैशिष्टयपूर्ण वन्य व पहाडी जमाती आहेत, तेवढया भारतातल्या इतर कोणत्याही राज्यात नाहीत. जगाच्या पाठीवरील बहुतेक प्रकारच्या वांशिक चेहऱ्यांचे प्रतिबिंब आसामातल्या कोणत्या ना कोणत्या तरी जमातीत पाहायला मिळते.

हे नैसर्गिक वैशिष्टय, समृद्धी आणि सौंदर्य, हे मानवी वैविध्य. सारे प्रसन्न वाटते. वाऱ्याच्या झुळकीने लवलवणारी भाताची कोवळी शेते, खास आसामी पद्धतीने बांधलेली लाकडी टुमदार घरे, मदमस्त नटयांनाही हेवा वाटावा असा सुरेख बांधा असणाऱ्या गोड चेहऱ्याच्या आसामी आणि इतर वन्य जमातींच्या स्त्रिया, ही सारी दृश्ये कशी आसामी वातावरणाला सुखावह स्निग्धपणा आणतात. तिऱ्हाइताला एकदम भुरळ पडावी! नाहीतरी पूर्वी आख्यायिका होतीच. आसामात परका माणूस गेला की त्याच्यावर चेटूक होते. तो परतत नाही. निसर्गच बहुधा हे चेटूक करीत असावा.

परंतु ही भुरळ थोडी बाजूला सारली, डोळे आणि कान उघडे ठेवले, थोडा कानोसा घेतला, लोकांच्या मनात डोकावण्याचा प्रयत्न केला तर एकदम दचकायला होते. या शांत पृष्ठभागाखाली काहीतरी भयंकर खदखदत असल्याची जाणीव होते. थैमान घालीत येणाऱ्या मेघांचा गडगडाट दुरून कानी पडावा, भूगर्भातील प्रचंड उलथापालथीची सूचना देणारा अस्पष्ट भयानक सूर ऐकू यावा किंवा कैक वर्षे सुस्तपणे झोपलेल्या सुप्त ज्वालामुखीने गुरगुरू लागावे तसे वाटते. नागालँड, मिझो टेकडया या ठिकाणी उत्पात घडले; पण हा सूर वेगळाच वाटतो. सारा आसाम ज्वालामुखीच्या तोंडाशी असल्यासारखा वाटतो. "आम्ही ज्वालामुखीच्या तोंडावर आहोत. कदाचित हा ज्वालामुखी मृतही असेल. पण ती शक्यता फार कमी," असे

एका आसामी पत्रकारानेच काढलेले हे उद्गार. यात अतिशयोक्ती किंवा भडकपणा काही नाही.

उत्तरेला चीन आणि दक्षिण व पश्चिमेला पाकिस्तान व पूर्वेला ब्रह्मदेश यांनी वेढलेला आसाम भारताशी अवघ्या वीस मैल रुंदीच्या पट्टीने जोडलेला आहे. कलकत्त्याहून गोहत्तीला रेल्वेने जायचे झाले तर साऱ्या पूर्व पाकिस्तानला पाऊण प्रदक्षिणा होते. या भौगोलिक अलगतेमुळे स्वातंत्र्योत्तर काळात आसाम सामाजिक आणि राजकीय दृष्टचा भारतातील इतर राज्यांहून जरा अलगच राहिला. परस्परां-विषयी असते तेवढी आसाम विषयी सामान्य माहितीही इतर राज्यांतील लोकांना नाही. "गोहत्तीत उतरलो तेव्हा अपेक्षा जरा वेगळीच होती," असे मी म्हणालो मात्र; त्यावर ताबडतोब आसाम काँग्रेसचे अध्यक्ष श्री. सिन्हा म्हणाले, "हां–हां. माहीत आहे तुमची काय अपेक्षा होती ते. सारे लोक असेच म्हणतात. हाती भाले घेऊन हिंडणारे, जंगली अर्धनग्न लोक गोहत्तीच्या रस्त्यांवरून हिंडत असतील हीच अपेक्षा होती ना? साऱ्यांची तशीच अपेक्षा असते." आपणांविषयी इतर भार-तीयांना कमी माहिती आहे, दूरत्व आहे आणि गैरकल्पना आहेत, हे आसामी लोकांना फार खटकते. आणि हे ते पुनःपुन्हा बोलून दाखवितात. या दूरत्वाचा मोठा मान-सिक परिणाम आसामी लोकांवर झालेला आहे.

त्यात पुन्हा चीन आणि पाकिस्तान या दोन शत्रुराष्ट्रांच्या कैचीत आसाम आहे. दुसऱ्या महायुद्धाची खरी झळ भारतात फक्त आसामनेच सोसली. चिनी आक्र-मणाचा मुख्य रोख आसामच्याच दिशेने होता आणि पाकिस्तानच्या सीमेवर भयंकर ताण होता. आसामच्या लोकांना आता हा कायमचा मानसिक ताण झाला आहे.

या बाह्य धोक्यांखेरीज काही अंतर्गत धोकेही भयानक रूप धारण करून आसामी लोकांना भेडसावत आहेत. नागा लोकांनी उठाव करून आपले वेगळे राज्य थाटले. आता मिझोंनी शस्त्र हाती घेतले आहे. आणि इतर टेकड्यांमधील वन्य पहाडी जमाती दरडावून आपल्या वेगळ्या राज्याची मागणी करीत आहेत. आसामातील पहाडी आणि मैदानी लोकांमध्ये परस्पर अविश्वासाचे विलक्षण संशयी वातावरण निर्माण झाले आहे आणि पूर्व पाकिस्तानातून आसामात दरवर्षी घुसणारे मुस्लि-मांचे प्रचंड लोंढे. त्यामुळेही एक मोठी धोक्याची आणि तितकीच नाजूक समस्या उत्पन्न झाली आहे.

संशय, अविश्वास, परस्पर भीती, द्वेष, अलग टाकल्याची टोचणी, इतरांकडून पिळले जात असल्याची भावना, न्यूनगंड आणि शत्रुसान्निध्यामुळे पडणारा मान-सिक ताण या साऱ्यांचा एकसंघ असा विलक्षण परिणाम आसामी मनांवर झाला आहे. प्रश्नाची जीवघेणी गुंतागुंत झालेली आहे. आणि परिस्थितीच्या या दबावा-खाली आसामी लोक अत्यंत अस्वस्थपणे जीवन कंठीत आहेत.

हे आसामी लोक आहेत तरी कोण, कसे आणि किती? बऱ्याचशा इतर

राज्यांच्या बाबतींत हे प्रश्न हास्यास्पद आणि पोरकट वाटतील; पण आसामच्या संदर्भात त्यांची उत्तरे महत्त्वाची आहेत. एकेका प्रश्नाचे उत्तर मिळत गेले की या राज्यातील प्रश्नांची तीव्रता प्रत्ययाला येऊ लागते.


## अल्पसंख्य आसामी

१९६१ च्या शिरगणतीप्रमाणे नेफा, मणीपूर, त्रिपुरा आणि नागालँड सोडून उरलेल्या आसामची लोकसंख्या सुमारे १ कोटी १९ लाख आहे. त्यात स्वतःला 'आसामी' न म्हणवता खासी, गारो वगैरे व वन्य् पहाडी जाती म्हणविणारांची संख्या २० ते २१ लाख आहे. मुस्लिमांची संख्या २७ ते २८ लाख आहे. त्याचबरोबर बंगालखेरीज इतर प्रांतांतून आलेल्यांची संख्या लाख दीड लाखाच्या वर आहे. बिहारी मजुरांची संख्या मोठी आहे. गंमतीची गोष्ट म्हणजे आसामच्या स्टॅटिस्टिकल हँडबुकमध्ये लोकसंख्येची सर्व तऱ्हेची विभागणी दिली आहे; पण भाषावार विभागणी मात्र दिलेली नाही. खरे कारण काय आहे कुणास ठाऊक ! पण आसाममध्ये बंगालमधून आलेल्या हिंदूंची आणि स्वतःला बंगाली म्हणविणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. ही संख्या कमीत कमी २० ते २५ लाख आहे. काही बंगाली पत्रकार हा आकडा फुगवून सांगतात.

म्हणजे स्वतःला अभिमानाने 'आसामी' म्हणवून घेणाऱ्यांची संख्या आहे तरी किती ? २८ लाख मुस्लिमांपैकी ९० टक्के मुस्लिम १९११ नंतर आसामात आले आहेत. आसामातील बंगाली लोक अजून स्वतःचे वेगळेपण राखून आहेत. आणि पहाडी लोकांना स्वतःला आसामी म्हणवून घेण्यापेक्षा खासी, गारो किंवा मिझो म्हणवून घेण्यात अभिमान वाटतो. या हिशेबाने आसामी भाषेविषयी, आसामी संस्कृतीविषयी, आसामच्या इतिहासाविषयी अभिमान बाळगणारांची संख्या अवघी ५५ लाखांच्या आसपास म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ५० टक्क्यांपेक्षाही कमी येते. एका आसामी पत्रकाराला मी हे सांगितले, तेव्हा त्याला ते पटेना; पण सरकारी आकड्यांवरून आणि त्यानेच सांगितलेल्या बंगाली भाषिकांच्या आकड्यांवरून मी त्याला हिशेब करून दाखविला, तेव्हा मात्र त्याचे डोळे फिरले.

बरेच जण हा हिशेब उघड करून दाखवीत नसले तरी त्यांना याची चांगलीच जाणीव आहे. या हिशेबाचे भविष्यातील परिणाम काय होतील याची भीती त्यांना भेडसावत आहे. ते टाळण्यासाठी दुसरे कोणते मार्ग चोखाळायचे याचा काही जणांचा विचार आणि तयारीही चालू आहे. आणि त्या अनुरोधाने नव्या आकांक्षा जन्म घेताहेत. वेगळे मनोरथ रचले जात आहेत. नव्याने सोबती शोधले जात आहेत. पाकिस्तानी मुस्लिम आक्रमणाचा जवळून विचार केला, म्हणजेच या हालचालींमागचा अर्थ उलगडू लागतो. आणि या समस्येचा अधिक जवळून परिचय होतो.

आसामी संस्कृतीचेही एक आगळे व्यक्तिमत्त्व आहे. पूर्व पाकिस्तानच्या निर्मितीमुळे स्वातंत्र्योत्तर काळात आसाम हा भारतापासून दूर राहिला. तसाच तो




ऐतिहासिक काळातही दूर होता. अनेकविध संस्कृतींच्या संघर्षातून एक वेगळे माधुर्य प्राप्त झाले आहे.

गोहत्तीत पहिल्या दिवशी पहिला मराठी माणूस दिसला तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक होता. रस्त्याने चालताना तो आसामविषयी जुजबी माहिती मला देत होता. रस्त्याने जाणाऱ्या काही आसामी मुलींकडे बघून तो मला म्हणाला, " ही बघा साडी नेसण्याची खास आसामी पद्धत. त्यांचे कमरेखालचे वस्त्र वेगळे असते आणि ओढणीचे वस्त्र वेगळे असते. " मी म्हणालो, " तुम्ही काहीही म्हणा, पण आसामी लोकांवर चिनी पद्धतीच्या पौर्वात्य मंगोलियन चेहरेपट्टीचा बराच प्रभाव पडलेला दिसतो." त्यावर त्या स्वयंसेवकाचे आर्यप्रेम एकदम जागे झाले असावे. तो म्हणाला, " छे: छे: ते शक्य नाही. ही आर्यभूमीच आहे. "

पण हे उघड आहे की, आसामातील बऱ्याच वन्य जमाती मंगोलियन वंशाच्या आहेत. त्यांच्यामध्ये आणि ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यामध्ये राहणाऱ्या मैदानी लोकांमध्ये पूर्वी व्यवहार झालेच असले पाहिजेत, आणि शिवाय त्याहीपेक्षा मोठी कारणे आहेतच.

पुराणामध्ये आसाम प्रदेशाला प्रागज्योतिषपूर म्हणून संस्कृत नावाने जरी संबोधिले गेले असले तरी हे नाव पगरजुह तीस या ऑस्ट्रो–एशियाटिक बोलीमधील शब्दांवरून बनले असावे, असे बऱ्याच आसामी पंडितांचे मत आहे. परंतु प्रागज्योतिष साम्राज्य बराच काळपर्यंत अनार्यांचे होते आणि उत्तर बंगालपर्यंत दूरवर त्याचा विस्तार पसरला होता हे सर्वमान्य आहे. महाभारतातच या प्रदेशाचा

म्लेंच्छ किंवा अनार्य देश म्हणून उल्लेख केलेला आहे. आर्य आणि वैदिक संस्कृती या भागात फार उशिरा पोचली. महाभारतात कौरवांच्या बाजूने लढणारा भगदत्त हा वंशाने मंगोलाईड होता आणि वैदिक धर्माचा पुरस्कर्ता होता. आसामातील आर्य-मंगोलाईड संस्कृतीचा आद्य पुरस्कर्ता भगदत्तच. त्याचे सैनिक "पिवळ्या वर्णाचे, चपटया नाकांचे असे किरात आणि सीन वंशाचे होते."

## वैदिक धर्माचा प्रसार

भगदत्तानंतर प्रागज्योतिषातील आर्य संस्कृतीचा प्रभाव वाढत गेला. अनेक देवळे होऊ लागली. वैदिक धर्माचा झपाटयाने प्रसार होऊ लागला. हा प्रदेश कामरूप म्हणून ओळखला जाऊ लागला. (कामरूप या शब्दाचेही मूळ ऑस्ट्रो-एशियाटिक शब्दांमध्ये असल्याचे काही आसामी पंडित सांगतात.) इसवी सनाच्या तेराव्या शतकापर्यंत छोटया-मोठया हिंदू साम्राज्यांची सत्ता आसामवर होती.

तेराव्या शतकात आसामच्या इतिहासाला आणि संस्कृतीला एकदम कलाटणी मिळाली. उत्तर ब्रह्मदेशातील शान जमातीतील एका राजपुत्राने या सुमारास आसाम-ब्रह्मदेश सीमेवरील पर्वतश्रेणी ओलांडून आपल्या अनुयायांसह आसामात प्रवेश केला. या जमातीला अहोम जमात म्हणत. अहोम लोकांनी आसामात प्रवेश केला, तेव्हा पूर्व आसामात चुहिया आणि काचारी या दोन वन्य जमातींची प्रमुख राज्ये होती. त्यांच्याकडून अहोमी सैन्याला जोराचा विरोध झाला; पण हा विरोध मोडून काढून पूर्व आसामात आपली सत्ता स्थापण्यात अहोम राजे लवकरच यशस्वी झाले.

आजूबाजूच्या परिस्थितीशी चटकन मिळते जुळते घेण्याचा विलक्षण गुण या अहोम लोकांमध्ये होता. ज्या ज्या प्रदेशांत ते गेले त्या त्या प्रदेशांतील वन्य जमातींना बरोबरीच्या नात्याने वागवून त्यांमध्ये ते चटकन मिसळून जात. त्यांच्याशी रोटीबेटी व्यवहार सुरू करून त्यांच्या चालीरीती ग्रहण करीत व आपल्या चालीरीती त्यांना शिकवीत. त्यामुळे अहोम राजांनी आपल्या राज्याचा पाया चांगलाच पक्का रोवला. त्यांचे साम्राज्य पश्चिमेलाही वाढू लागले. थोडयाच अवधीत सारा आसाम त्यांच्या ताब्यात आला. त्यांनी हिंदू चालीरीती उचलल्या. हिंदू धर्माचा पुरस्कार केला. धर्माची सत्रे स्थापिली. गावे नेमून दिली. अधिकार दिले. अर्थातच या पुरस्कारामध्ये त्यांच्या आदिधर्माच्या चालीरीती होत्याच. त्यामुळे आसामातील हिंदुधर्मावर अहोमी संस्कृतीचा चांगलाच प्रभाव पडला आहे. आणि त्याचा आसामी लोकांना अभिमानही वाटतो.

अहोम राजांनी आसामला प्रबळ आणि स्थिर धर्मसत्ता दिली, त्याचप्रमाणे त्यांनी मुस्लिम आक्रमकांनाही आसामच्या उंबरठयापासून शेवटपर्यंत दोन हात दूर ठेवण्यात यश मिळविले. सन १२०५ पासून मुस्लिम आक्रमकांनी आसामच्या दारावर धडका देण्यास सुरुवात केली. काही काही वेळा आत शिरकाव करून घेण्यात

त्यांनी यशही मिळविले. पण दर वेळी त्यांना माघार घ्यावी लागली. तेराव्या शतकापासून मुस्लिमांनी आसामवर १५-१६ मोठी आक्रमणे केली आणि दर वेळी अहोम राजांनी त्यांना परत फिरविले. १६९१ ते १७१४ या काळातील अहोम राजा रुद्रसिंग हा अती प्रबळ व धर्मप्रिय होता. आसामी इतिहासकार त्याची तुलना शिवाजीशी करतात.

रुद्रसिंगानंतर मात्र अहोम राजाची सत्ता उतरणीला लागली. भाऊबंदकी वाढू लागली. धार्मिक तंटे होऊ लागले. काही जणांनी पुढे ब्रह्मदेशातून मदत मागविली. त्यामुळे १८१८ ते १८२४ या काळात आसामात संपूर्णतया ब्रह्मदेशीयांची सत्ता होती. पुढे लगेच एक-दोन वर्षांत ब्रिटिशांनी कुरापती काढून ब्रह्मदेशीयांना हाकून लावले आणि १८२६ मध्ये आसाम ब्रिटिश साम्राज्याला जोडला गेला. हळू हळू खासी, जैनतिया, नागा या टेकड्याही ब्रिटिश शासनाखाली आल्या आणि अशा रीतीने साऱ्या भारताशी-आसामचा प्रथमच प्रत्यक्ष संबंध आला.

आपल्या या वेगळ्या इतिहासाचा आसामी लोकांना अभिमान आहे आणि त्याना वेगळ्या संस्कृतीचे कौतुक आहे. संख्यात्मक न्यूनगंड त्यांच्यांत असला तरी सांस्कृतिक श्रेष्ठत्वाची तीव्र जाणीव त्यांच्यांत आहे. संस्कृतीच्या बाबतीत ते बिहारी मजुरांना आणि बंगाली लोकांनाही आपणापेक्षा कमी दर्जाचे लेखतात, असे आढळून येते. महाराष्ट्रीयांबद्दल त्यांच्या मनात आदर असावा.

## बिगर आसामींचा प्रवेश

ब्रिटिशांनी आसामात प्रवेश केला तेव्हा त्यांनी आपल्याबरोबर कारकुनी कामे करण्यासाठी शिकलेले बंगाली बाबू नेले. चहाचे मळे जेव्हा आसामात सुरू झाले तेव्हा मळ्यांत मजुरी कामे करण्यासाठी बिहारी कामगार नेले. बंगालमध्ये इंग्रजांचे राज्य आधी आल्याने ते शिक्षणात पुढारलेले होते. त्यामुळे हळूहळू त्यांचे आसामातील प्रस्थ वाढू लागले; ते इतके की पुढे आसामातील साऱ्या महत्त्वाच्या, जबाबदारीच्या जागा, कारकुनी जागा बंगाली लोकच अडवू लागले. ते आपली भाषा, संस्कृती वेगळी ठेवीत होते.

स्वातंत्र्यानंतरही या परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. उलट आता सर्व भारतातील लोक वेगवेगळ्या नोकरीधंद्याच्या निमित्ताने आसामात येऊन थडकू लागले. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून पूर्व बंगालातील मुस्लिम लाखोंच्या संख्येने आसामात घुसत होतेच. आसामी लोकांना हे खुपत होते. डाचत होते. सर्व बाजूंनी त्यांच्यावर घाला येत होता. शिक्षणाच्या बाबतीत, नोकऱ्यांच्या बाबतीत त्यांची पीछेहाट होत होती. उपऱ्यांचे वर्चस्व वाढत होते. आसामी भाषेची प्रतिष्ठा राखली जात नव्हती. असंतोष वाढत होता आणि त्याचाच परिस्फोट १९६० सालच्या दंग्यामध्ये झाला.

गोहत्तीत गेलो तेव्हा हा आसामी-बिगर आसामी किंवा त्याहीपेक्षा आसामी-

बंगाली वाद अजून तेवढा तीव्र असेल याची कल्पना नव्हती. गोहत्तीत एका मराठी माणसाने सांगितले, " साठ साली या आसामी लोकांनी बंगाल्यांना चांगलं ठोकून काढलं. तेव्हापासून लेकाचे वर मान करून बघत नाहीत. "

थोडी फार तशीच परिस्थिती होती. या विषयाची बंगाली पत्रकार किंवा आसामातील बंगाली लोक फार दबून आणि जपून चर्चा करतात. पण तिऱ्हाइताला मात्र या साऱ्या गोष्टींमध्ये आसामी लोकांचीच चूक कशी आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात. आसाम्यांच्या आसामी राष्ट्रवादाला कसे खतपाणी घातले जाते, हे सांगतात. आणि १९६० साली त्यांनी बंगाल्यांवर कसे अत्याचार केले, याचीही भडक वर्णने करतात.

या विषयावर मला आसामी लोकांची बाजू समजावून घ्यायची होती. आसामी लोक तसे खरोखर फार चांगले, मनमिळाऊ आणि आतिथ्यशील लोक आहेत. ते क्वचितच रागावतात. आणि गोड बोलतात. भांडण करण्याचे टाळतात. आणि वादग्रस्त विषयांवरही ते विशेष बोलत नाहीत. गोहत्तीमधील उजान बाजार ही सर्वांत स्वच्छ वस्ती आसामी लोकांची. आसामी तरुण मुले तर अतिशय अबोल आणि लाजाळू. कुणी या विषयावर बोलायला तयार होईना. एका बंगाली पत्रकाराकडे बसलो असता तिथे ए. आय. सी. सी. चे आसामी सभासद श्री. एस. नंदी हे बसले होते. माझ्या तोंडून हा विषय अस्पष्टसा निघताच ते थोडेसे उसळून म्हणाले, " मग महाराष्ट्रात तरी काय आहे? महाराष्ट्र आता फक्त महाराष्ट्रीयनांसाठी? शिवसेना काय आहे मग ?" बस्स एवढेच. नंतर त्यांनी स्वतःला सावरले. मी त्यांना वादात ओढण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनी ते टाळले.

## अनर्थाचे मूळ

अखेर असा रागावून बोलणारा खास आसामी पत्रकार मला आसामची राजधानी शिलाँग येथ भेटला. मुठी वळवीत, डोळे गरगरा फिरवीत, दातओंठ खात तो म्हणत होता–" दीज बास्टर्ड सिल्हेटी बंगालीज–हे हरामखोर सिल्हेटी बंगाली लोक–हेच या साऱ्या कारवाया करतात. काम करीत नाहीत काही नाही. नुसतं गलिच्छ राजकारण करत असतात– "

मी जरा आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागलो तेव्हा त्याच दमात तो म्हणाला, " तुम्ही मला जातीय म्हणा की काहीही म्हणा. पण या सिल्हेटी बंगाल्यांचं नाव घेतलं की माझ्या तळपायाची तिडीक मस्तकापर्यंत पोहोचते. आम्ही आसामी लोक क्वचितच प्रक्षुब्ध होतो. वी आर ए व्हेरी डोसाईल पीपल. पण यांचं नाव घेतलं की मी काही स्वतःला आवरू शकत नाही. "

बोलता बोलता मी त्याला सहज एक प्रश्न विचारला होता. आणि त्यावरून हा विषय निघाला होता. मी विचारलं होतं, " आसामच्या इतक्या समस्या आहेत. कुठली समस्या तुम्हांला सर्वांत गंभीर वाटते ? पाकिस्तानी घुसखोरीची की पहाडी

प्रदेशांची ?" त्यावर तो उत्तरला, " खरं सांगू माझ्या दृष्टीने आमची सर्वांत मोठी डोकेदुखी आहे ती या सिल्हेटी बंगाल्यांची (हिंदू). दे आर रिअल ट्रबल मेकर्स. तेच या साऱ्या कटकटी निर्माण करतात. भलभलत्या कल्पना लोकांच्या मनात भरवणारे तेच. आसाममधल्या साऱ्या बंगाल्यांविषयी मी म्हणत नाही. इतर बंगाली बिचारे गरीब आहेत. पण हे सिल्हेटी बंगाली–"

आसाम सीमेपलीकडील पूर्व पाकिस्तानातील सिल्हेट हा जिल्हा. "या हिंदू सिल्हेटी बंगाल्यांनीच भलत्या कल्यनांच्या आहारी जाऊन अगदी ठरवून जनता कौलाच्या वेळी सिल्हेट जिल्हा पाकिस्तानच्या घशात टाकला. चाबूक बसायला लागले तेव्हा लेकाचे हे पळून इकडे आले, आणि इकडेही कारवाया करायला त्यांनी सुरुवात केली. पहाडी लोकांना चिथावणी देणारे ते हे सिल्हेटी बंगालीच, आसामातल्या तरुणांना वेगळ्या आसामची भुरळ पाडणारे हेच सिल्हेटी आणि आसामी–बंगाली असा जातीय आणि भाषिक वाद पेटवणारे हेच ते सिल्हेटी बंगाली. यांनीच आसामी भाषेची नाचक्की करण्याचा प्रयत्न केला. यांनीच आसामी ही गाढवांची भाषा आहे, अशा घोषणा देणाऱ्या मिरवणुकी शिलाँगमध्ये काढल्या. आणि त्यामुळेच त्या १९६० सालच्या दंग्यांना सुरुवात झाली–"

बाकीचे सारे मुद्दे तेव्हा मला अनाकलनीय होते तरी त्याच्या शेवटच्या मुद्याचा अर्थबोध मला होत होता. आसामातील त्या १९६० सालच्या भाषिक दंगलींना खरे तोंड लागले ते शिलाँगमधील या मिरवणुकीनेच आणि या मिरवणुकीत बंगाली लोकांनी ' आसामी ही गाढवांची भाषा आहे, ' अशा अर्थाच्या घोषणा दिल्याचे या दंगलीची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या सी. पी. सिन्हा कमिशननेही मान्य केले आहे.

या दंगलींच्या मागची मुख्य कारणे म्हणजे भाषेचा प्रश्न आणि आसामी लोकांची सरकारी नोकऱ्यांमध्ये होत असलेली पद्धतशीर पीछेहाट. गोहत्तीच्या रिफायनरीमध्ये आसामी लोकांना नोकऱ्या मिळत नव्हत्या. इतरही केंद्रीय नोकऱ्यांमध्ये आसामी लोकांना डावलले जाते, अशी त्यांची तक्रार होती. आसामी लोकांची किती पीछेहाट होते याचे एक बोलके आणि ताजे उदाहरण त्या पत्रकाराने मला सांगितले. १९६७ साली आसामची राजधानी शिलाँग या शहराची लोकसंख्या दीड लाख आहे. आणि त्यामध्ये खुद्द आसामी लोकांची संख्या आहे अवघी दहा ते बारा हजार.

आसामी ही राज्यभाषा म्हणून जाहीर करावी या विषयीचे वादंग १९४७ पासून माजले होते. बंगाली लोकांना आणि पहाडी जमातींना हे मान्य नव्हते. आसाम साहित्य समितीने याविषयी १९५९ साली एक ठराव केला, तेव्हा या चळवळीला जोराची चालना मिळाली. आणि चळवळीला विरोधही वाढू लागला. मैदानी प्रदेशात आसामी राज्यभाषा जाहीर करावी आणि पहाडी प्रदेशात पहाडी लोकांना मान्य होईल तेव्हा ती जाहीर करावी, असे एक समीकरण आसाम प्रदेश काँग्रेसने सुचविले. त्याला दोन्हीही बाजूंकडून विरोध होऊ लागला. दोन्ही बाजूंचा प्रचार

वाढू लागला. कुरबुरी वाढू लागल्या. आणि अशा तंग अविश्वासाच्या परिस्थितीतच २१ मे १९६० रोजी शिलाँगमध्ये काही बंगाल्यांनी मिरवणूक काढून आसामी भाषेला तुच्छ लेखणाऱ्या घोषणा दिल्या. त्यामुळे परिस्थिती अधिकच बिघडली.

चौकशी कमिशनच्या अहवालानुसार आसामात येणाऱ्या कलकत्त्याच्या बंगाली भाषिक वृत्तपत्रांनी आपल्या आसाम भाषाविरोधी प्रचारामुळे या परिस्थितीत आणखीच तेल ओतले. आसाम भाषाविरोधी प्रचार वाढू लागला. मरीयानी स्टेशनवर बंगाली विरोधी घोषणा देणाऱ्या आसामी तरुणांवर काही बंगाली तरुणांनी हल्ला केला आणि लुमडिंगला एका सिनेमागृहात दंगामस्ती करून बंगाली तरुणांनी तेथे चालू असलेला सिनेमा बंद पाडला.

वातावरण पेटले. आता आसामी भाषिकांच्या चळवळीने उग्र रूप धारण केले. बंगाली घरांवर हल्ले होऊ लागले. मारपीट होऊ लागली.

त्या वेळी झालेल्या घटनांना विशेष महत्त्व न देण्याचा प्रयत्न आसामी लोक करतात तर बंगाली लोक त्यांचे भडकपणे वर्णन करतात. " अक्षरशः शेकडोंनी बंगाली मारले गेले आणि बंगाली स्त्रियांवर अत्याचार झाले, " असे एका बंगाली माणसाने मला सांगितले.

## वाया गेलेली हिंसा !

" मी पूर्वी ज्या संघटनेत काम केले आहे त्या संघटनेच्या नावावरून तरी मला कुणीही जातीय म्हणणार नाही, " असे सांगणाऱ्या एका वस्तुनिष्ठ बंगाली पत्रकाराने मात्र मला शांतपणे सांगितले, " लोक मेले, थोडे अत्याचार झाले हे खरे आहे; पण हा झगडा कुणाकुणांत होता हे तुमच्या ध्यानात आले काय ? आसामी भाषिक विरुद्ध हिंदू बंगाली असा हा झगडा होता. त्यामुळे आपण आसामी भाषिक आहोत हे सिद्ध करून देण्याची ज्यांना गरज होती अशांना ही सुवर्णसंधी प्राप्त झाली होती. पाकिस्तानातून घुसलेल्या मुस्लिमांचा प्रश्न तेव्हाच वर येऊ लागला होता. आणि आपण पाकिस्तानी नसून आसामीच आहोत हे पटवून देण्याची त्यांना तातडीची गरज होती. आणि त्यांनी या घुमश्चक्रीत चांगलाच हात धुवून घेतला. नुसत्या आसामी लोकांना शिव्या मोजण्यात काय अर्थ ?"

ते काहीही असो, पण या वेळी तरी आसामी लोक चांगलेच भडकले होते. आणि त्यांनी बंगाल्यांना यथेच्छ पिटून धाक बसविला.

पण शिलाँगच्या त्या रागीट आसामी पत्रकार मित्राच्या मते ही सारी हिंसा वाया गेली आहे. त्याच्या मते गोहत्तीतील किंवा मैदानातील गरीब बिचाऱ्या बंगाली लोकांना काहीच बिघडवले नव्हते. खरे चोर सिल्हेटी बंगाली आहेत. ते राहतात शिलाँगसारख्या पहाडी प्रदेशात. ते आपले सहीसलामत सुटून मजा पाहत बसले आणि शिक्षा झाली ती त्या गरीब बिचाऱ्या निरपराधी बंगाल्यांना.

या घटना घडून आता सात वर्षे झाली. पण त्या वेळची तंगी, तो अविश्वास

आणि ते संशयाचे वातावरण अद्याप विशेष कमी झाले नाही. आसामी राज्यभाषा म्हणून जाहीर झाली. पण त्यानेही काही विशेष साधले नाही. नोकऱ्यांच्या बाबतीत आसामी तरुणांवर अजूनही अन्याय होत असल्याचा तक्रारी गोहत्तीत सर्व वृत्त-पत्रांच्या पत्रव्यवहारातून येतात. परिस्थिती अजून जशीच्या तशीच आहे. त्यात विशेष फरक नाही.

या परिस्थितीत फरक पडत नाही म्हणून किंवा आणखी दुसऱ्या कोणत्या कारणाने म्हणा, पण आसामातील काही टोकाच्या लोकांच्या विचारसरणीत सूक्ष्म फरक पडू लागला आहे. अनेकांशी मी बोललो, आत कुठला तरी वेगळाच अस्पष्ट सूर होता. पण तो हाती लागत नव्हता. अस्पष्ट असल्याने विश्वासही बसत नव्हता.

आणि याही बाबतीत शिलाँगचा तो रागीट पत्रकार मित्र माझ्या मदतीला धावून आला. बोलण्याच्या ओघात तो म्हणत होता–" आणि काही मूर्ख तरुण लोक, नागा लोक, सिल्हेटी बंगाली त्यांना चिथावणी देतात आणि त्यांना वाटते, बस्स्, आसाम वेगळा काढला की संपले आपले प्रश्न. आपली संस्कृती वेगळी आहे. आपला इतिहास वेगळा आहे; मग आपण वेगळे का न व्हावे, असे त्यांना वाटते."

" अशी चळवळ आहे ? " मी विचारले.

" चळवळ आहे असे म्हणता येणार नाही, पण तशी सूक्ष्म भावना काही हित-शत्रूंकडून चांगलीच रुजविली जाते आहे आणि अशा मोडतोडीच्या कल्पना तरुण मनांना सहज आकर्षून घेतात."

" पाकिस्तानी आक्रमणाविषयी (Infiltration) तुम्ही बऱ्याच लोकांशी बोललात ना ? "

" हो– "

" मग आता लक्षात येते आहे ? "

तो सूचित करीत होता त्या गोष्टी माझ्या केव्हाच ध्यानात आल्या होत्या. पण त्यांवर विश्वास बसत नव्हता.

[ अपूर्ण ]

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड
शर्मा स्वीट मार्ट
दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

## धग

दूरच दूर
आभाळ पूर
ओल्या डोळ्यांत... जळता सूर
पहाड पार
घर ना दार
सुन्न झाडांना... पानांचा मार
वाटच वाट
वळण घाट
काळीज भर... शून्य विराट
तळघात ढग
धरून तग
कोरीत बसे... पाषाण जग

—राजा महाजन

## तीन कविता

ही वाट अशी—
दूर दूरवर नेते
अन् खोल दरीशी अडते.
हे दुःख असे—
महापूरसे वाहते
अन् थेंब थेंबसे झरते!

●

पायांखालची सावली
माझ्यावर कधीच रुसली नाही
तिने फक्त एकदाच विचारले:
'ही वाट कधी संपेल रे!'

●

कुण्यातरी ज्ञानेशाचा
पाठी फिरू दे गा हात
आणि वेदमंत्र फुटो
माझ्या दुबळ्या कंठात!

●

—लक्ष्मीकांत तांबोळी

## घर

गेलो श्रमून पुरता
चाल किती जन्मांची ही
कोण्या जन्माचा आठव
काही उरलाच नाही ॥१॥
किती जणांची सोबत
भल्या प्रवासा लाभली
आता उरलो एकटा
वाट लागता वेगळी ॥ २ ॥
दिसो लागे घर आता
माझ्या डोळ्यांना चालता
कंप पायांना सुटला
असा कसा आज ताता ॥ ३ ॥
कंप भीतीचा नव्हे हा
ही तो ओढ भेटीसाठी
पायी तिथंवर येण्या
शक्ति नुरे जगजेठी! ॥ ४ ॥
कृपावंत होऊनिया
तूच धावूनिया येई
तुझ्या चुकल्या लेकरा
कटी, खांद्यावर घेई! ॥ ५ ॥

—श्रीधर देशपांडे



# आस्वाद

राजा महाजन यांनी अवकाशाच्या प्रलयाचे रसभरित वर्णन केले आहे. असेच अगदी थोडक्या शब्दांत. एखाद्या काडयाच्या पेटीवर हिमालयाचे चित्र असावे तसे 'आभाळपूर' या कवितेचे दर्शन वाटते. कवितेचे शीर्षक जितके संदिग्ध आहे तितके आतले वर्णन नाही. पहाड पार । घर न घार ।। या अगदी थोड्या शब्दांनी डोळयांपुढे एक विशाल गिरिप्रदेश उभा राहतो. समोर लांबच लांब वाट गेलेली पाहिली की, मनुष्याला एक प्रकारची भयानक एकलेपणाची जाणीव होते. ही वाट आपणांला एकटी चालावी लागणार आहे. या कल्पनेमुळे मनुष्य हतबुद्ध होतो. आणि ही वाट कधीच चालून होणार नाही, अशी एक निराशावादी वृत्ती बळावते. मग मनुष्य हृदयातल्या हृदयातच काही कल्पना कुरवाळीत बसतो. असा मोठा सुंदर शेवट आहे.

अशीच एक वाट लक्ष्मीकांत तांबोळी यांनी रेखाटली आहे. पण ही वाट वरच्या वाटेसारखी प्रदीर्घ आणि न संपणारी नाही. ती मध्येच अडली आहे, पुष्कळदा आपण स्वतः संकटे सोसत राहतो पण आपल्या बरोबरीची प्रिय व्यक्ती मात्र सहप्रवासाला कंटाळते. म्हणून माणसाला सावलीच विचारते की, 'वाट केव्हा संपणार ?' पण केव्हा केव्हा या खडतर प्रवासात ज्ञानाची भूकही मनुष्याला लागते, हे शेवटच्या कडव्यात दाखवून कवीने करुणाला उदात्ताची जोड दिली आहे.

हीच वाटचाल श्रीधर देशपांडे यांच्या 'घर' या कवितेत सुरू आहे. यातही कवी एकटाच आहे; पण पहिल्याप्रथम प्रवासात काही सोबती होते, आपले आणि जगाचे सहसा पटत नाही आणि आपली वाट त्यामुळेच वेगळी होते. या वाटेवर आपले ध्येयमंदिर दिसू लागले आहे. परंतु खडतर प्रवासामुळे जीव टेकीला आला आहे. इतक्या दिवसांची शक्ती खलास झाली आहे. मंदिराच्या दारापर्यंत तरी पोचता येईल की नाही, याची वानवा वाटते. म्हणून तर परमेश्वरी शक्तीची करुणा भाकायची. वाट दीर्घ असो, अडलेली असो किंवा संपलेली असो, मनाची व्यथा अटळ राहते. हेच या तीन कवितांचे तात्पर्य.

*—गोपीनाथ तळवलकर*

" अहो ऐकलं का ? म्हटलं उठताय नं... ते पाह्यलं का...?" शकुंतला मला उठवीत होती. तरी रात्री झोपताना मी तिला निक्षून सांगितलं होतं की, 'उद्या रविवार आहे, मी चक्क साडेदहा-पर्यंत झोपणार. म्हणून ! ' तर ही आधीच उठवू लागली होती.

" वाजले किती ? " मी तिचा पांघरूण ओढणारा हात हातांत घेत विचारलं.

" नऊ वाजलेत. अहो, हे काय. सोडा पाहू हात. काही काळवेळ ? बाहेर कोण आलंय पाहा बरं उठून... " तिनं हात सोडवून घेतला.

" कोण आहे ? सांग मी झोपलोय म्हणून. "

" अहो, मी सांगितलं पण ऐकतील तर ते सद्भावजी कसले ? "

" सद्याच आहे नं, सांग दुपारी यायला... "

" नाही ऐकत ते. तुम्हीच सांगा. म्हणजे ऐकतील..."

" काय कटकट आहे बुवा ! " मी पांघरूण दूर सारून उठलो आणि झक्क-पैकी एक आळस देऊन बाहेर आलो अन दारातच थबकलो.

माझ्याकडे त्याची पाठ होती अन् आर-शात तो स्वतःची छबी न्याहळत होता. स्वतःचे कपडे तीन–तीनदा न्याहळत होता.

" काय हो बुवा ? " मी डोळे चोळत त्याला म्हटलं, त्यासरशी तो गर्रकन माझ्या-कडे वळला. खिडकीतून येणाऱ्या सूर्य-किरणात त्याचे बूट चमकले. नवीनच दिसले.





**अतीश दीपंकर**

होय ! अठराव्या शतकातली नाणी. पेटी भरून नाणी ! हिरे, मोती, जडजवाहीर, पाचू, मोहरा, सोन्याच्या चिपा, दागिने, चांदीचे दागिने, चांदीचे रुपये, राणी छाप रुपये, अधेल्या, पावल्या.

"हॅलो, माय दोस्त...." तो हसत म्हणाला, "काय, कशी काय दिसतीय ही पॅंट ?"

"झकास..." मी पुन्हा एक आळस देत म्हणालो; "पण मूर्खा, हे काय तुला नंतर नव्हतं दाखवता येत ?"

"आणि हा शर्ट ?" माझं बोलणं त्याच्या ध्यानीही नव्हतं. "टेरिलीनचा आहे...आयता घेतलाय. कसाय ?"

"उत्तम..."

"दोन्हीही आयतेच. पॅन्ट नि शर्ट... केवढ्याला नाही विचारलंस ?"

"केवढ्याला ?"

"दोन्ही मिळून एकशे सात रुपये... आणि तेवीस रुपयांचे बूट. आज हा देह एकशे तीस रुपयांनी सजलाय महाशय.."

"ती बेरीज केली मी मनात. पण काय रे हे पैसे कुठून आणलेस इतके ?" मी सावध झालो होतो, झोप तर पार उडालीच !

"तेच मांगायला आलोय, पण तुझी झोप संपेल तर ना...? काय हो वहिनी झालाय का चहा ?"

"हो हो. आणते हं..." शकुंतलानं आतून सांगितलं.

"तर बरं का मी गेलो होतो आज सकाळी प्रभाकर काटदरेकडे. त्याला सारी परिस्थिती सांगितली अन् शंभर रुपये उसने मागितले."

"अन् त्यानं दिले म्हणतोस ?"

"हो परिस्थितीच तशी आहे ! मग तिथून गेलो विठ्ठल चलवादीकडे. त्याला पैसे मागितले. उसनेच ! तर म्हणतो कसा,

'अरे, आत्ताच एकाला दिले.' मग त्यालाही परिस्थिती सांगितली समजावून, तशी मग झटकन खिशातून चाळीस रुपये काढून दिलेन लेकानं."

"आश्चर्य आहे..." मी.

"अरे, तेच ना. तर म्हणतो कसा, 'सावकाश दे, काही घाई नाही!' मी म्हटलं, उद्याच संध्याकाळी घेऊन जा. एकदा तो खजिना मोजल्यावर कर्ज कशाला ठेवू डोक्यावर?" सहजतेनं सदू म्हणाला.

"खजिना?" मी ओरडलोच...मी आश्चर्यानं त्याच्याकडे पाहू लागलो.

"होय!" सदू निर्विकार मुद्रेनं म्हणाला, "तेच तर तुला सांगायला आलो होतो. पण तुझी ती झोप—"

"ती उडलीय रे केव्हाच. बोल, मला ते सारं सविस्तर सांग...हं बोल," मी घाई करू लागलो.

"अहं, आत्ता नाही. आत्ता मला गेलंच पाहिजे. आत्ता सकाळी दहाचा मुहूर्त चांगला आहे. मी पाहिलंय पंचांग. पूजा करणार आहे त्या धनाची."

"असं?" मी डोळे विस्फारून म्हटलं.

"होय नं. हे बघ मला जरा पैसे दे. उद्या देईन मी तुझे. प्लीज..."

"ते देतो रे...पण किती खजिना मोठा आहे?"

"तुला मी मागंच सांगितलं होतं ना?"

"वाड्यातल्या तळघराचंच ना?"

"येस् तेच...एकदम सक्सेस..."

"म्हणजे सात उंट?" मी विचारलं.

"अहं, त्यावर लादलेली संपत्ती. सात उंटांवर लादलेली संपत्ती. आणि त्याचा मालक मी एकटा. सदाशिव नाईक कोटयधीश! लक्षाधीश! टाटा, बिर्ला आणि नंतर मीच! सदाशिव नाईक. पूर्वजांची पुण्याई. दुसरं काय? पण बरं का दोस्त, त्यालाही भाग्य लागतं. म्हटलं भाग्य! अरे, इथं पाहिजे. मग सारं मिळतं. काय?" सदाशिव कपाळावर बोट ठेवीत म्हणाला.

"होय बाबा, होय." शकूनं आणून दिलेला चहाचा कप त्याच्यापुढे करीत मी म्हणालो.

"मग तेवढं पाहतोस ना?" चहाचा घोट घेत त्यानं विचारलं.

मी मान डोलावून उठलो. कपाटातून पैसे काढता काढता माझ्या मनात आलं. "सात उंटांवर लादलेल्या संपत्तीच्या मालकाला आज मी उसने पैसे देतोय. मी दहाच्या पाच नोटा त्याच्या हातांत ठेवल्या.

"उद्या नक्की देतो. आणि हे पाहा परवा नेलेले चाळीस..."

"मी विचारलंय का त्याचं?"

"पण."

" पण नको नि परंतु नको ! बरं, पण ते सारं सांगणार केव्हा ? "

" हे पाहा आता तू हे पैसे दिलेस ना ? आता मी बाजारात जाणार. तीन-चार रुपयांचा ऊद न्यावा लागेल. असा कुबट वास आहे म्हणतोस त्या तळघरात. चार रुपयांची फुलं नेणार आहे. उदबत्त्या, कापूर, गुलाल ह्यात दोन-तीन रुपये जातील. पूजा करून मगच ते पैसे वापरायचं ठरवलंय मी. आणि एक गोदरेजचं कपाटच घेऊन टाकतो विकत. आज नुसतं नॉमिनल पैसे भरतो. म्हणजे उद्या घरी आणायला बरं. ठीक तर जाऊ मी ? "

" हो. "

" हे पाहा मी दुपारी येतो. नाहीतर नको वेळच नाही होणार. लागलीच मोजूनही टाकीन सारे पैसे. रात्री येतो. कसं ? "

" जेवायलाच ये नं...." मी म्हटलं,

" वा: उत्तमच ! मग मारू गप्पा रात्रभर ! जाऊ मी ? "

" हो. नक्की ये पण ? "

" येस. थँक्यू माय दोस्त, " असं म्हणून तो निघून गेला. मी मोरीत जाऊन दात घासू लागलो.

सदू माझा जुना मित्र. शनिवारात त्याचा एक वाडा आहे. एकटा जीव सदाशिव ! कोणीही नातेवाईक नाही. वाड्यात हल्ली बिऱ्हाडं असतात. पूर्वी त्याच्या आजोबांना पेशव्यांनी सात उंटांवर लादलेली संपत्ती बक्षीस दिली होती. त्यांनी ती ह्याच वाड्यात कुठंतरी तळघरात लपविली होती. सदूच्या वडिलांना ती प्रयत्न करूनही सापडली नाही. आणि सदाशिवाचं भाग्य थोर म्हणून त्यानं ती शोधून काढली होती. आणि आज तो श्रीमंत झाला होता. आपला एक मित्र इतका श्रीमंत आहे याचाच मला अभिमान वाटू लागला होता. शकूला तर वेड लागायचंच राहिलं होतं. रात्री तो जेवायला येणार म्हणून तिनं पुऱ्या तळल्या, बटाट्याची भाजी केली, पापड, चटणी...एक ना दोन...

" वहिनी, आज कसला सण आहे ? हा एवढा बेत म्हणून विचारतो हं ? " सदून विचारलं.

" सणच नाहीतर काय ? तुम्हांला खजिना मिळाला हे काय वाईट झालं ? " शकूनं म्हटलं.

" शू: ! अहो, हळू बोला. भिंतींना कान असतात. हं, दोन पुऱ्या वाढा. " सदू म्हणाला.

" दोन का चार घ्या की, " शकू म्हणाली.

" आग्रह अंगाशी येईल बरं ! " सदू म्हणाला.

" येऊ देत " शकू हसत म्हणाली, " उद्या जेवू नका फार तर. "

" छे: उद्या मला त्या विनीवालेच्या आईनं जेवायला बोलावलंय. नाही गेलो तर

रागावेल ती..."

" ते बाकी खरंच आहे म्हणा." मी उगीचच म्हणालो.

हसत खेळत, गप्पा मारीत जेवणं झाल्यावर सदूनं सांगायला सुरुवात केली.

" मनाचा निश्चय होत नव्हता. एकदा वाटे का उगीच श्रम करावेत? सध्या का काही कमी आहे? घराचं भाडं येतंय वेळचं वेळी. एकटयाचं भागतं त्यात. पण दुसरा विचार असा येई, एवढी संपत्ती घरात आहे मग चैन तरी का करू नये? आणि ह्याच विचारानं सारी जमवाजमव केली. एक पहार, एक बॅटरी, एक दोरी अन् एक चाकू असं सामान बरोबर घेतलं.

आठ दिवसांपूर्वीची गोष्ट. मी तो जीर्ण नकाशा काढला आणि त्यांत सांगितल्याप्रमाणे प्रथम मी माझ्याच खोलीत असणाऱ्या त्या शिवाजीच्या तसबिरीमागील खुंटी आत ढकलली.. तोच जुन्या दाराचा करकर आवाज व्हावा तसा आवाज होत होता. एका भिंतीतलं एक गुप्त दार उघडलं गेलं. मी त्या दारातून आत शिरलो. आतली दुसरी खुंटी पुढं ओढली दार आपोआप बंद झालं. मी जिथं उभा होतो ते एक प्रशस्त दिवाणखाना होता. सर्वत्र संगमरवरी फरशी होती. तिथले खांबसुद्धा संगमरवरीच होते. छताला सर्वत्र हंड्या, झुंबरे लटकत होती. जमिनीवर बरीच धूळ साचलेली होती. मी डाव्या हाताचे खांब मोजीत पुढं पुढं गेलो. आणि तेराव्या खांबाशी थांबलो. मान वर करून मी वर पाहिलं. तो खांब छताला टेकलेलाच नव्हता. पाहणाऱ्याला जरासुद्धा संशय येत नव्हता. नकाशाबरहुकूम मी वागत होतो. मी जरा जोर लावून तो खांब पुढं ढकलला. आणि त्याखाली मला खाली जायला पायऱ्या दिसू लागल्या. मी त्या पायऱ्या उतरून खाली आलो. अशी कामागून एक, एकामागून एक, दालनं पार करून मी शेवटी एका छोटया दालनात आलो. त्या दालनाला सहा भिंती होत्या. अन् त्या प्रत्येक भिंतीत एक एक गुप्त दार होतं. मी प्रत्येक दालन खोलून पाहिलं. एक धान्याचं कोठार होतं, एक देवघर, तर एकात जुनी शस्त्रे होती. एक खास खासगी मसलतीची जागा होती, एकात कपडे होते पण ते सारे उंदीर-घुशींनी खाल्लेले होते. अन् एक शेवटचं दार खुद्द माझ्याच घरात म्हणजे मी जेथे राहतो त्याच खोलीत उघडत होतं.

इतकं करूनही मला त्या संपत्तीचा शोध लागला नव्हता. मी खूप थकलो होतो. नकाशात तर ह्याच खोलीत धन आहे असं लिहिलं होतं. पण माझी निराशा झाली होती. पुढं काही असेल म्हणावं तर नकाशात त्याचा उल्लेख नव्हता. अखेर तो नाद सोडून मी खोलीत येऊन पडून राहिलो. पण मनातले विचार काही केल्या जात नव्हते. तब्बल सहा दिवस मी ह्याच गोष्टीचा विचार करीत होतो. दुसरं काही सुचतच नव्हतं. अन् अखेर..."

" अखेर काय?" मी व शकूनं एकदम विचारलं...

" अखेर मला एक कल्पना सुचली. त्या सहा भिंतींच्या दालनाची मी कसून

तपासणी घ्यायचं ठरवलं. काल रात्रीच हे माझ्या मनात आलं. रात्रीचे अकरा वाजले होते. मी उठलो. सारं सामान घेतलं. आता जवळची वाट मला माहीत झाली होती. त्या वाटेनं मी त्या दालनात आलो. पायांनी जमीन ठोकून पाहू लागलो. अन् मी जिंकलो. मला संपत्ती सापडली होती. एका ठिकाणी जरा जमीन पोकळ असल्यासारखं वाटलं. तिथली फरशी मी पहारीने काढली. तो त्या खाली एक कडी होती. अठराव्या शतकात माझ्या आजोबांनी त्यावर वाहिलेली फुलं वाळून गेलेली होती. मी ती फुलं हातांत घेऊन एकदा हुंगली. शंभर वर्षं वास कसा टिकणार ?

मनात देवाचं नाव घेऊन मी ती कडी ओढली. आणि तिथलं गुप्त दार उघडलं गेलं. आतून...खालून एकदम प्रकाश वर आला. खाली जाण्यासाठी सात पायऱ्या स्पष्ट दिसत होत्या. मी त्या पायऱ्या उतरू लागलो.

प्रत्येक पायरी उतरताना एकेका उंटावरच्या संपत्तीचा मी मालक होत होतो. अखेर सातही पायऱ्या उतरून मी खाली गेलो. पाहतो तर काय, जमिनीवर सर्वत्र नाण्यांचे, मोत्यांचे ढीगच ढीग पडले होते. चौदा-पंधरा पेट्या पडल्या आहेत. मी प्रत्येक पेटीत पाहिलं. माझे डोळे फिरून गेले !"

"काय होतं त्यात ?" मी मध्येच विचारलं...

"अठराव्या शतकातील नाणी !" सदू म्हणाला.

"अठराव्या शतकातील ?" शकुंतला पुन्हा तेच पुटपुटली.

होय ! अठराव्या शतकातील नाणी. पेटी भरून नाणी ! हिरे, मोती, जडजवाहीर, पाचू, मोहरा, सोन्याच्या चिपा, दागिने, चांदीचे दागिने, चांदीचे रुपये, राणी छाप रुपये, अधेल्या, पावल्या, दहा नये पैसे, पाच नये पैसे, आणि सारं हे माझं. हर्षानं नाचावं, की ओरडावं हे मला कळेना. मी वेडावलो. त्यातली काही नाणी मी ओंजळीत घेतली आणि स्वतःच्या डोक्यावर उधळून घेतली...आज मी कृतार्थ झालो असं वाटतंय मला आणि आज सकाळी त्या काटदरेकडून, अन् चलवादीकडून पैसे उसने घेतले आणि हे कपडे केले. आज मी खुषीत आहे दोस्त ! आज सकाळीच त्याची पूजा केली. आता उद्यापासून चैन, आराम, दुसरं काही नाही. हो; पण तुझे हे पन्नास रुपये दिल्यावरच हं."

"खरंच, तुम्ही भाग्यवान आहात भावजी..."

"अरेच्या, गप्पात दीड वाजला की...चला निघतो मी..."

"झोपतोस का इथंच ?" मी विचारलं...

"अहं. तुम्हीं दोघं झोपा इथं. मी आपला माझ्या खोलीत बराय. हो ! एक लक्षात ठेवा, हे कुणाला बोलू नका. तुम्ही वहिनी, तुम्हा बायकांच्या पोटात काही म्हणून राहत नाही."

"छे: हो ! मुळीसुद्धा सांगणार नाही कुणाला..."

" ठीक तर अच्छा ! जाऊ मी...गुडनाईट... "

...आणि सात उंटांवर लादलेल्या संपत्तीचा मालक निघून गेला. मी दाराला कडी लावली. शकुंतलानं अंथरुणं टाकली. बेडलॅम्प लावून मी टयूब बंद केली. बेडलॅम्पचा मंद प्रकाश सर्वत्र पसरला. शकुंतलेच्या कमरेभोवती हात टाकून मी तिला जवळ ओढली आणि मी तिला म्हणालो,

" चला, झोपायला हवं. उद्या ऑफिस आहे. खजिना सदूला सापडलाय आपल्याला नाही..."

ती व मी दोघंही हसलो. हसता हसता मी तिच्या ओठांवर ओठ टेकवले अन्...

तेवढ्यात शकू ताडकन माझ्यापासून दूर झाली आणि अंथरुणात उठून बसत मला म्हणाली—

" पण काय हो, अठराव्या शतकात पाच आणि दहा नया पैशांची नाणी होती तरी का ? "

●


तुमची जिव्हाळ्याची बँक

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(११७७ बुधवार पेठ, पुणे २)

**आपल्या ११६ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध. विदेश-विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टी सेवा यांच्यासह बँकिंगचे सर्व व्यवहार केली जातात.**

*अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.*

चिं. वि. जोग
*जनरल मॅनेजर*

शं. ल. किर्लोस्कर
*अध्यक्ष*




.... हे स्वप्न नव्हे —

येत्या दोन हंगामात अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचा आपला निर्धार आहे.

त्यासाठी....

- पाण्याचा थेंबन् थेंब शेतीसाठी वापरला पाहिजे.
- दुबार पिके घेतली पाहिजेत.
- संकरित बियाणे वापरले पाहिजे.

**महाराष्ट्राची स्वयंपूर्णता ही आजची प्रतिज्ञा**

प्रसिद्धि संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई.


# शिवपूर्वकालीन समाजजीवनाचे प्रत्ययकारी चित्रण

## पुस्तके

रणजित देसाईंच्या 'स्वामीने' ऐतिहासिक मराठी कादंबरीला एक वेगळे वळण दिले असे मानण्यात येते. कल्पनेच्या स्वैर विहाराला वाव न देता इतिहासाशी इमान राखून व्यक्तिमत्त्वाचे सर्वांगीण पैलूदर्शन घडविण्यात त्यांनी नावीन्य आणि कौशल्य दाखविले.

गोपाल नीलकण्ठ दांडेकरांच्या 'बया दार उघड' या कादंबरीने सुरू होणाऱ्या संकल्पाचे अधिष्ठान याहून वेगळे आहे. त्यात आणखी नावीन्य आणि कौशल्य आहे. नावीन्य अशासाठी, की ऐतिहासिक पार्श्वभूमीवर कुणा 'नायका'चे जीवनदर्शन घडविण्याचा दांडेकरांचा पवित्रा नाही. त्यांच्या कादंबरीचा साचा त्यातला नाही; किंबहुना तिला साचा नाहीच; कुणा बहुरंगी व्यक्तिमत्त्वाकडे दांडेकरांची नजर नाही. त्यांच्या डोळ्यांपुढे आहे सारा तत्कालीन महाराष्ट्र. तोच

# बया दार उघड



निशिकांत मिरजकर

त्यांच्या कादंबरीचा प्रमुख नायक आहे. येथे व्यक्ती आहेत. अनेक व्यक्ती आहेत. त्यांच्या कृतींमध्ये आणि तदनुषंगिक प्रसंगमालेत काहीएक सुसंगतीही निर्माण झाली आहे; पण त्या साऱ्या व्यक्ती आणि त्यांनी भोगलेले वा घडविलेले प्रसंग यांच्या सुमेळातून तत्कालीन महाराष्ट्राचे जे सुस्पष्ट, रेखीव, जिवंत आणि संवेदनावाहक चित्र सांघले जाते त्याची लय महत्त्वाची आहे. दांडेकरांनी आपल्या संकल्पाला नावच मुळी 'कादंबरीमय शिवकाल' असे दिलेले आहे. ही ' ऐतिहासिक कादंबरी ' नाही ! हा कादंबरीमय समाजपुरुष आहे. त्याचे जीवन, त्याच्या भावना, त्याच्या विपदा येथे चितारल्या आहेत. म्हणजे आतापर्यंतच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांहून या कादंबरीचे पोत वेगळे आहे. एखाद्या व्यक्तीच्या भावानुभवांच्या आकृतिबंधासाठी येथे ऐतिहासिक घटनांची पार्श्वभूमी रंगविलेली नाही; किंवा इतिहासाच्या सहसंवेदनाने व्यक्तिमत्त्वाच्या तंतूंची गुंफण करण्याचाही येथे प्रयत्न नाही. उलट तत्कालीन परिस्थितीचा, वातावरणाचा खराखुरा हृत्स्पर्शी प्रत्यय येण्यासाठी कादंबरीचे संजीवन—वापरले गेले आहे. कृत्रिमपणे नव्हे, उत्स्फूर्तपणे, सहजपणे.

या कादंबरीलाही कथानक आहे, संविधानक आहे; पण ते वरील संदर्भात. इतिहासाशी शक्यतो इमान राखणे, निदान तसा आभास उत्पन्न करणे हे ऐतिहासिक कादंबरीच्या कथानकाला आवश्यक मानले जाते. येथे इतिहासानेच सुव्यक्त होण्यासाठी एका संविधानकाचा मागोवा घेतला आहे. मगरूर सरदाराने सुलतानजीला आणि त्याच्या जोडीच्या शेलारांना केलेल्या निर्दय मारझोडीपासून उगम पावलेले कथानक, त्याचा मुलगा राणोजी तरुण लढवय्या होऊन जिजाऊमासाहे-

बांच्या प्रसूतिसमयी पुत्रजन्माने आनंदित होण्यापर्यंत चालते. रेंगाळतेच म्हणा ना; पण या संथ प्रवाहातूनच ते जी प्रतिबिंबे व्यक्त करते ती विलक्षण खळबळजनक आहेत. पराकाष्ठेची बोलकी आहेत. अंगावर शहारे आणणारी आहेत.

शिवपूर्वकालीन महाराष्ट्राची सारी दुःखे त्यांत गदगदली आहेत. क्रूर जेत्यांनी आसुरी समाधानासाठी केलेली इथल्या रयतेची विटंबना, तिच्यावरील अत्याचार, जुलूम यांचे क्षोभजनक वृत्तांत त्यात आहेत. इथल्या दुर्बल सामान्यांच्या निष्क्रिय प्रतिकारशून्यतेचे उद्वेगजनक चित्र त्यात आहे. खानाला सुवर्णांचे होन देऊन देशमुखी मिळविणारा सुलतानजी आहे आणि किल्लेदाराच्या छाताडावर हलगी वाजवीत डाका घालणारा गंभीरराव आहे. सुवर्णासाठी खून पाडणारे, तरुणीचे ओठ शिवून तिला कुत्र्यासारखे हिंडवणारे अमानुष यवन आहेत आणि माऊसाहेबांच्या नजरेच्या इशाऱ्यावर जान-कुर्बान करण्यास उत्सुक असलेला दौलतबंकी राणोजी आहे. जेवणाच्या पंगती आणि अमानुष कत्तली, देवळांचा विध्वंस आणि चोरूनमारून केलेली भजने–सारे पैलू कातीवपणे पाडलेले आहेत. त्यांतून अनेक भावनांची, अनेक विचारांची, अनेक वेदनांची पण एकाच परिणामाची एक भावाकृती सांधली जाते. तत्कालीन महाराष्ट्राच्या भेदक अगतिकतेचा, वाया जाणाऱ्या पौरुषाच्या वैफल्याचा हताश परिणाम आवर्त घेतो. हे सारे आपल्या नजरेसमोर घडत आहे असे वाटत राहते आणि ' बया दार उघड ' ही महाराष्ट्राची करुण आर्त हाक आकार घेते.

## रेखीव चित्रांची मालिका

दांडेकरांना जे सावावयाचे आहे, त्याची त्यांनी प्रभावीपणे पकड घेतली आहे. त्यांना इतिहासाची अनिवार ओढ आहे. नव्हे, इतिहासात विरघळून जाण्याची त्यांची वृत्ती आहे. प्रसंग वर्णन करताना कल्पनेने ते त्या प्रसंगात शिरतात, आणि डोळ्यांपुढे जसाच्या तसा उभा करतात. त्यांच्या कल्पनेचे निरीक्षण सूक्ष्म आणि अचूक आहे. प्रसंगातला बारीकसारीक तपशील ती सहजगत्या टिपून घेते आणि अगत्याने पुढे मांडते; किंबहुना ही कादंबरी म्हणजे अनेक लहानमोठ्या रेखीव, स्पष्ट, त्रिमिती चित्रांची–प्रसंगचित्रांची–मालाच आहे. त्या त्या प्रसंगांच्या कारक व्यक्ती, त्यांच्या हालचाली आणि बोलाचाली, आजूबाजूचा परिसर यांवर कल्पनेचा बोलका प्रकाश केंद्रित होत जातो.

याला साहाय्यभूत होते दांडेकरांची भाषाशैली. अन्यत्र क्वचित जादाच वाटणारे तिचे कमालीचे आवाहक स्वरूप येथे तत्कालीन वातावरणाचे ठसे कोरून घेण्यास उपकारक ठरते. तत्कालीन बोलीशी जणू ती चटकन एकरूप होते. बखरीतील प्रवाहाने सुस्नात होते. ' डोळियांची धणी फिटेल', ' कुणाच्या हिंमतीवर एल्गार बोलावा,' ' धरित्रीतुळणेची ठेव ' अशांसारखे शब्द टाकोटाक पेरीत जाते. संपन्नतेचे वर्णन करताना ती जितकी फुलून येते, दिमाखाने मिरविते, तितकीच विपत्तींचे

वर्णन करताना ती कठोर होते. मर्मभेद करते. " मकईच्या कणसाला मोल, तेवढंही दो पायांवर उभ्या माणसाला नाही," अशी रोखठोक स्पष्टोक्ती बोलते.

या कादंबरीतील वर्णनांचा तपशील श्री. दांडेकरांनी अभ्यासपूर्ण रीतीने अगदी अचूक भरला आहे. " तत्कालीन सामाजिक जीवनाची ओळख फार जवळून ह्या कादंबरीत वाचकांना होईल......एकूण एक जीवन कसं उद्दस होतं, याचं दर्शन इथं होईल......यात गोतसभा दिसेल. लोकांची वेतनप्रियता दिसेल. सुलतानी राजवट दिसेल. सामाजिक संकेत, मानापमान, निळा, परस्परसंबंध आणि रीति-रिवाज उमगतील...त्या वेळची हत्यारं, वस्त्रं, कागद, लेखण्या, ग्रंथ, औषधं, पदव्या, देवस्थानं, किल्ले, वाडे, बांधकामं, खेडी, सरकारी कामकाज, न्यायनिवाडे, वगैरे अनेक गोष्टींचा तपशील अगदी नेटक्या वास्तवतेनं आप्पासाहेबांनी भरला आहे."—श्री. ब. मो. पुरंदरे यांच्या प्रस्तावनेतील हे उल्लेख यथार्थच आहेत. केवळ स्तुतिपर नाहीत. या वास्तवदर्शनामागे जिव्हाळा आहे, श्रद्धा आहे, उत्कटता आहे. शिवपूर्वकालीन महाराष्ट्राची स्पंदने येथे सहीसही उतरली आहेत, ती त्यांचे पडसाद लेखकाच्या संवेदनेने आतुरतेने टिपून घेतले म्हणूनच ! येथे भीषण नाट्य आहे; पण नाटकीपणा नाही. भावोत्कटता आहे, पण भोंगळ, भावविवशता नाही. रेखीव वस्तुदर्शन आहे, पण अभ्यासदर्शक अनावश्यक तपशील नाही. दांडेकरांच्या संकल्पाचे हे पहिले पुष्प अपेक्षा वाढविणारे ठरले आहे.

('बया दार उघड'– गोपाळ नीलकण्ठ दांडेकर
मॅजेस्टिक बुक स्टॉल : मूल्य आठ रुपये : पृष्ठे २६४)


लाल महाल प्रतापगड पन्हाळगड
राजगड पुरंदर आग्रा
मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे : मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

सुधाकर राजे

# भिंतीच्या तुंबड्या

## □ त्रिकालदर्शी कॉम्प्यूटर

आजच्या कॉम्प्यूटर यंत्रांची लीला परमेश्वराइतकीच अगाध आहे, हे आतापर्यंत बऱ्याच वेळा अस्मादिकांनी कबूल केले आहे. पण उद्याचा कॉम्प्यूटर तर परमेश्वरालादेखील बाद ठरवील की काय असा रंग दिसतो. भविष्यकाळांतल्या मानवाची करमणूक कशी असेल याचे चित्र रंगविताना एक रशियन तज्ज्ञ नुकतेच म्हणाले, पुढे येणाऱ्या काळात माणसाने रेडिओचा काटा फिरवावा त्याप्रमाणे कॉम्प्यूटरचा काटा फिरवला की त्याला जोडलेल्या टेलिव्हिजनच्या पडद्यावर भूतकाळातल्या प्रसंगांचे चालते बोलते चित्र दिसू शकेल; कारण, एखाद्या ऐतिहासिक घटनेची पुरेशी माहिती कॉम्प्यूटरला पुरवली की त्या वर्णनाबरहुकूम त्या घटनेचे जिवंत चित्र कॉम्प्यूटर आपल्या पडद्यावर दाखवू शकेल.

म्हणजे आता त्रिकालज्ञानासाठी योगसामर्थ्य कमवायला नको, इलेक्ट्रॉनिक इंजिनियरिंगचा कोर्स पुरा करायला पाहिजे; अन् दुसरे म्हणजे आता बऱ्याच ऐतिहासिक कूट प्रश्नांचा जागच्या जागी निकाल लागला म्हणायचा ! उदाहरणार्थ, बाबासाहेब पुरंदऱ्यांनी काटा फिरवल्याबरोबर रायगडाला जाग येईल व बाबासाहेब प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांनाच विचारतील, " आबासाहेब, ते सगळं राहू द्या, पण एका गोष्टीची जातीने शहानिशा करा पाहू... तुमचा जन्म सन १६२७ चा की १६३० चा ? " अन् यदाकदाचित् शिवाजीमहाराज सांगू शकले नाहीत तर बाबासाहेब प्रत्यक्ष राजमाता जिजाबाईलाच पडद्यावर बोलावतील.

आता एका टोकाला बाबासाहेब पुरंदरे तर दुसऱ्या टोकाला मी. कॉलेजात संस्कृतचा विद्यार्थी असताना " कालिदास किती ? " या फालतू प्रश्नाने मला बराच त्रास दिला होता. तेव्हा मी पहिली गोष्ट जी करीन ती म्हणजे तमाम कालिदासांना पडद्यावर बोलावून रांगेत उभे करीन आणि आमच्या संस्कृतच्या प्राध्यापकांना सांगेन– " यांतला तुम्हांला हवा असलेला कालिदास निवडून घ्या–अन् पुनः मुलांना असले प्रश्न विचारून त्रास देऊ नका. "

## □ राजकारणाचा खेळ ( खंडोबा )

हिंदुस्थानातल्या राजकीय पक्षोपपक्षांत खेळाडू वृत्ती बाणावी, या उद्देशाने पिंगपाँगचे आंतर–पक्षीय सामने ठेवायची कल्पना निघाली आहे ! कल्पना स्तुत्य आहे यात शंकाच नाही; कारण, राजकारण हाही एक " (घाणेरडा का होईना) खेळच " आहे असे जाणते म्हणतात. पण प्रश्न असा आहे की, राजकीय वृत्तीने खेळ

खेळले जातात तितकेच खिळाडू वृत्तीने राजकारण खेळणे सोपे आहे का ? लाल चीनमध्ये पिंगपाँग चांगले खेळता येण्यासाठी माओचा विचार आत्मसात केला पाहिजे, अशी घोषणा झाल्यापासून आपल्याकडचे डावरे साम्यवादी पिंगपाँग खेळणे हे जागतिक क्रांतीला पोषक असे वैचारिक कार्य आहे, अशा निष्ठेने खेळतील हे कबूल. पण बाकीच्यांचे काय ? प्रत्यक्ष साम्यवाद्यांतही आता डावे—उजवे होऊ लागले आहेत; तेव्हा उजवे म्हणतील, खेळाडूने खेळताना फार डावीकडे झुकणे नियमबाह्य असावे. स्वतंत्र—पक्षीय म्हणतील अर्थव्यवस्थेत काय किंवा खेळात काय, नियमांचे बंधन कशाला ? प्रत्येक खेळाडूला आपापल्या नियमाप्रमाणे खेळण्याचे स्वातंत्र्य असावे. भारतीय जनसंघ म्हणेल या कंदुकक्रीडेने भारतीय संस्कृतीच्या कुठल्या अंगाचे रक्षण होणार आहे, याचा आधी विचार व्हायला हवा ! नाहीपेक्षा कबड्डी का नको ? समाजवादी म्हणतील, हिंदुस्थानात जेवढे समाजवादी पक्ष आहेत तेवढे चेंडू एकदम खेळायला घेतले तरच मजा येईल; उलट काँग्रेसवाले म्हणतील, देशात स्थैर्य नांदायचे असेल तर चेंडू फक्त काँग्रेसच्याच हाती असावा आणि काँग्रेसने मारलेला चेंडू चुकला तरी त्याची शिक्षा म्हणून इतर सर्व पक्ष आऊट समजावेत. एका बाबतीत मात्र सगळ्यांचे एकमत होईल, अन् ती म्हणजे कुठल्याही पक्षाच्या खेळाडूने खेळता खेळता मध्येच किती वेळा भिडू बदलावा हे आधीपासूनच ठरविण्यात यावे. पण एवढा सगळा गोंधळ माजण्याची मुळातच शक्यता दिसत नाही ! कारण, प्रत्येक खेळाला अंपायर लागतो; अन् या राजकीय पिंगपाँग मॅचचा अंपायर कोण ? राज्यकर्ते एक नाव सुचवतील, तर सर्व विरोधी पक्ष एकजुटीने आपला अंपायर उभा करतील. म्हणजे खेळाला प्रारंभ होण्यापूर्वीच खिलाडू वृत्तीचा अंत होईल ! तेव्हा सध्या जेवढा खेळखंडोबा चालला आहे तेवढा पुरे. त्यात आणखी पिंगपाँगची भर नको.

## □ तत्त्वज्ञानी शर्ट

एखादा विचार अंगात भिनण्यासाठी काय करायला पाहिजे ? तो विचार कापडावर छापून त्या कापडाचे कपडे घालायला पाहिजेत. निदान पेकिंगमध्ये जी फॅशन नुकतीच निघाली आहे, त्यावरून असे अनुमान करायला हरकत नाही. पेकिंगमधल्या निष्ठावंत माओवादी मंडळींत माओ—वचने छापलेल्या कापडाचे शर्ट घालायची टूम निघाल्याचे वृत्त आहे. अंगातला माओवादी शर्ट अंगाशी घासला जाऊन ज्याप्रमाणे खुजलीच्या स्पर्शाने सर्वांगाला खाज सुटावी, त्याप्रमाणे कपड्यांतला माओवाद अंगात भिनेल, अशी कल्पना दिसते. पण मला वाटते एखादे कापड फास्ट कलरचे निघाले तर त्याच्यावरची माओ—वचने कितीही घाम गाळला तरी अंगावर उतरायची नाहीत ! तेव्हा अशा माओविरोधी कापडाचा धोका पत्करण्यापेक्षा माओचा विचार अंगावरच गोंदवलेला काय वाईट ? माओवाद घामाबरोबरच अंगात जिरविण्याची एकदम डायरेक्ट मेथड ! ●

# उर्दू वार्ता

संकलन : हिदायतखान

## □ मुशावरतचे अंतरंग

दिल्लीत सहा माणसे एकत्र आली. त्यांनी लखनौ येथे एक मेळावा भरवला व त्यात ६५ माणसे निवडली गेली. इतरांना टाळलं गेलं. त्यांतून निवडक अशा २१ लोकांची एक समिती बनली. तीच 'ऑल इंडिया मुस्लिम मजलिसे मुशावरत !' 'जमितउल उलेमा' व 'जमाअते इस्लामी' या संघटना तीतून फुटल्या तरी ती 'ऑल इंडिया'च राहिली ! या समितीनं मुस्लिम समाजाचा एक मोठा मेळावा भरविण्याचे वचन देऊन ते पाळले नाही, आणि तरीही समस्त मुस्लिम समाजाची प्रातिनिधिक संघटना असल्याचा ती दावा करू लागली !

प्रस्तुत समितीनं हिंदू-मुस्लिम ऐक्य हे आपले ब्रीद घोषित करूनही त्या दृष्टीनं प्रत्यक्ष कृती काहीच केली नाही. तसेच निवडणुकीमध्ये प्रत्यक्षपणे भाग घ्यावयाचे नाही, असे ठरले असताही निवडणुकीमध्ये अक्षरशः घुमाकूळ घातला ! समोर दिसेल त्याला अध्यक्ष वा सेक्रेटरी बनवून जिल्ह्या–जिल्ह्यांत हे मुशावरतचं लोण पोचवलं ! गावोगावी मुशावरतचे प्रतिनिधी मुस्लिमांच्या धार्मिक भावनांना आवाहन करू लागले. मशिदींतून–दर्ग्यांतून–वाटेल तेथे !

जगाच्या इतिहासातही राजकारणासाठी धर्माचा अशा प्रकारे दुरुपयोग केलेला आढळत नाही !

परंतु भारतातील सर्वसामान्य जनतेप्रमाणं मुस्लिमही आता दुधखुळे राहिलेले नाहीत. दूध आणि पाणी यांतील फरक कळण्याइतपत तेही शहाणे झाले आहेत. परिणामी मुशावरतमागच्या राजकारणाचा उग्र दर्प त्यांना आल्याशिवाय राहिला नाही !

शेवटी मुस्लिमांनी मुशावरतचे म्हणणे फक्त ऐकले, पण केले मात्र तेच जे त्यांच्या मनाला पटले–आवडले !! 'परचम-इ-हिंद (५–३–६७) दिल्ली

## □ जर्मन मुलींचा विक्रम !

पश्चिम जर्मनीत सरासरी रोज एक १३ वर्षाची अल्पवयीन मुलगी माता बनते ! एका वर्षात १३ ते १५ वर्षांच्या १३०० मुलींना गर्भ राहतो ! अकराव्या वर्षीच मुलींना ऋतुस्राव सुरू होण्याचे प्रमाणही शेकडा ४० आहे ! त्यामुळे लहान वयातच लैंगिक शिक्षण देण्याची गरज निर्माण झाली आहे; कारण तरुण-तरुणींना अल्पवयातच एकमेकांविषयी भयंकर आकर्षण निर्माण झाल्यामुळे दैनंदिन व्यवहारावर त्याचा विपरीत परिणाम होऊ लागला आहे. त्यांची कार्यक्षमता घटू लागली आहे.

यासंबंधी अशाच एका अल्पवयीन तरुणाने आपल्या शिक्षकांना विचारले, "तुमच्या काळी प्रेमाच्या रूपात शारीरिक आकर्षणाचा आविष्कार होत असे. हल्लीच्या अल्पवयीन मुलामुलींत आढळणारी अतिरिक्त शारीरिक आसक्तीही त्याचाच परिपाक होय. तथापि अद्यापही मुला-मुलींना लैंगिक शिक्षण देण्याबाबत मोठमोठ्या तज्ज्ञांतही मतभेद आहेत. पालकांनाही ते तितकेसे योग्य वाटत नाही. परंतु परिणामीं मुलेमुली अज्ञानापोटी अनैतिक व अघोरी मार्गानं आपल्या सुप्त कामना पुऱ्या करून घेत आहेत !

रशियात माध्यमिक शाळांतून मला-मुलींना लैंगिक शिक्षण दिले जाते ! हॅम्बुर्ग येथे मन मानेल तेथून लैंगिक ज्ञान ग्रहण करण्याचे मुलांना स्वातंत्र्य आहे ! तरीही अनेक तरुणतरुणी या विषयात अनभिज्ञ असलेले आढळतात.

पश्चिम जर्मनीत दरवर्षी एकूण दहा लाख मुले जन्मतात आणि तितकेच गर्भपात होतात ! याशिवाय लपूनछपून होणाऱ्या भ्रूणहत्या वेगळ्याच.

'इन्क्लाब' (१५-३-६७.)

## ☐ लहान तोंडी

भारत व अरब राष्ट्रांचे संबंध तसे पाहता जिव्हाळ्याचे. अरबांच्या धार्मिक स्वातंत्र्याचा भारताने नेहमीच पुरस्कार केलेला. त्यांचे अंतर्गत संघर्ष आपसात मिटावेत म्हणून प्रत्यक्ष हस्तक्षेप न करताही प्रयत्न केलेले आहेत. /

परंतु असे असूनही काही अरब राष्ट्रे भारत-पाक वैमनस्यात पाकच्या बाजूने उभी ठाकतात, आणि उभयतांतील किल्मिष दूर करण्यास मदत करण्याऐवजी ते अधिकच दृढ करण्याचा 'अव्यापारेषु व्यापार' करताना दिसतात !

या प्रकरणी परराष्ट्र मंत्री श्रीयुत छागला यांनी 'सिरीयन अरब न्यूज एजन्सी'चे प्रमुख संपादक श्री. इब्राहिम शकूर यांना एक मुलाखत देऊन पुढील विचार व्यक्त केले आहेत. काही अरब राष्ट्रे भारत–पाक संबंधांबाबत जो जहरी प्रचार करतात तो त्यांनी त्वरीत थांबवावा. त्यांना भारत-पाक संबंधांचे नीट आकलन होत नसेल, या विषयीचे ज्ञान नसेल, तर गप्प तरी बसावे. उगाच लहान तोंडी मोठा घास घेण्याचा प्रयत्न करू नये ! भारत-पाकचा हा खासगी व अंतर्गत प्रश्न आहे, म्हणून त्यात ढवळाढवळ तरी करू नये. कोणा एकाची बाजू घेतल्यानं ही समस्या सुटणारी नसून उलट त्यामुळे हा गुंता अधिकच गुंतागुंतीचा होणार आहे.

जोवर या राष्ट्रांचा उद्देश भारत-पाक संबंध सुधारण्यासाठी काही विधायक कृती करण्याचा नाही, तोवर त्यांचे प्रयत्न फोलच ठरतील. म्हणून या राष्ट्रांनी अशी कळलावी भूमिका सोडून काहीतरी समेटाचा प्रयत्न करायला हवा !

–'परचम–इ–हिंद' (२–४–६७)

## ☐ खुदा बचाएँ !

हल्ली फॅशनचे फॅड इतके जबरदस्त वाढले आहे, की रस्त्यावर फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशनच सुरू आहे की काय, असा क्षणभर भास व्हावा !

अंगप्रत्यंगांचे दर्शन घडविणारी नायलॉनची पातळे, पो. टि. मा. पोलकी. सध्याच्या उकाड्याच्या दिवसांत तर त्या पोलक्यांची लांबीरुंदी आणखीनच आकसलेली.

अन्य धर्मीय महिलांप्रमाणेच अंगोपांगाचे प्रदर्शन करण्याची ही आवड मुस्लिम महिलांतही निर्माण होऊ पाहत आहे. वस्तुत:, पूर्वीइतका कडक गोषा आता उरलेला नाही. तथापि अगदीच पड्यासह 'सारंच सोडणं' कितपत योग्य आहे ? हजरत महंमद पैगंबरांच्या पत्नी–आयेशा–यांनी एकदा आपल्या माचीनं आखूड दुपट्टा छातीवर घेतला होता तेव्हा केवढा गहजब केला होता !

हल्लीच्या वीतभर दुपट्ट्याने उफाड्याचं 'तारुण्य' काबूत ठेवण्याचा प्रयत्न म्हणजे उधळलेल्या एखाद्या मदमस्त गजराजाला शिवण्याच्या दोऱ्यानं बंदिस्त करण्यासारखाच प्रकार !

'हदीस' मध्ये एके ठिकाणी महंमद पैगंबरांनी असं म्हटलं आहे की, एक काळ असा येईल की, त्या वेळी बायकांच्या अंगावर कपडे असूनही त्या अनावृत भासतील !

–तो काळ फारसा दूर नसावा, असं वाटतं; व म्हणूनच एकेकाळी पडदानशीन असलेल्या ह्या अनावृत ललनांच्या अब्रूवर शेवटी त्या सर्वशक्तिमान 'खुदा'लाच पडदा टाकावा लागेल, असं वाटतं. **उर्दू टाइम्स** (मुंबई)

## कायदा गाढव असतो !

एकदा एका पांढरपेशा गृहस्थानं आपल्या घराचं दार उघडलं तो समोर प्रेत पडलेलं ! कोणी तरी खून करून मृतदेह इथे आणून टाकला होता ! त्या गृहस्थाने घाबरून आपल्या घराचं दार एकदा जे बंद केलं ते प्रेत तेथून उचलून नेईपर्यन्त उघडलंच नाही ! मग त्या गुन्ह्याच्या तपासात पोलिसांना मदत करण्याची गोष्ट दूरच राहिली.

थोड्या फार फरकानं वरील पांढरपेशा गृहस्थाप्रमाणेच आम्ही नेहमी वागत असतो. उगाच कायद्याच्या कचाट्यात सापडायला नको, म्हणून कित्येकदा आपल्याला माहीत असलेलं सत्यही आपण बोलून दाखवत नाही; याला कारण आपल्यातील नैसर्गिक भीती तर आहेच; परंतु कायद्याचा आडमुठेपणाही आहे, अधिकाऱ्यांची बेपर्वाई, बेमुर्वतखोरपणाही आहे.

पोलिस अधिकाऱ्यांनी आपल्या कामात अधिक कार्यक्षमता व तत्परता येण्याच्या दृष्टीने जनतेला त्रास न होता त्यांचे मौलिक साहाय्य घेतल्यास कित्येक गुन्ह्यांचा गुंता सुटण्यास मोलाची मदत होऊ शकेल आणि नागडे सत्य बाहेर पडू शकेल.

**'परचम–इ–हिंद'** (२–४–६७)

# रंगभूमी

चिंतामणीचे
रंग उलगडणारा

# कांचन रंग

शरद गोखले

कलाक्षेत्राची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. चित्रपट व नाट्यवस्तूंच्या रूपाने त्यात सातत्याने भर पडत आहे. अशा परिस्थितीत एखाद्या नाटका-सिनेमातील एखादा प्रसंग, एखादी व्यक्तिरेखा, अथवा उपकथानक पाहत असताना 'हे पूर्वी कुठंतरी पाह्यलंय वरं का' याची जाणीव होणे आणि मग पाहत असलेल्या कथाविषयाशी समरस होण्याऐवजी कुठं वरं पाहिलं हे, याची आठवण करण्यात रंगून जाण्याचा प्रसंग वारंवार येतो.

रसिक प्रेक्षकांना अशी तसदी पडू नये, म्हणून कित्येक वेळा लेखक स्वतःच मान्य करतो, बाबांनो मूळ कल्पना अमक्याची. मी अनुवाद करणारा "अविष्कार" "कथा सूत्र" आदी शब्दांचा वापर करून. मूळ कथालेखकाला थोडेफार श्रेय देण्याची तयारी काही चोर-लेखक दाखवतात.

पण एखादा चोर मांजराच्या जातीचा असतो. बेंट्याला वाटत घरं आडबाजूचं आहे. आजूबाजूलाही कोणी नाही. घ्या ताव मारून ! उघड्या डोळयांनी चोरी केली तरी सत्य उजेडात आल्यावर मात्र मनोबांना बंद डोळयांनी मुकाट्याने पळ काढावा लागतो.

## सापडला रे सापडला

' नाटच शिल्पी,' नामक मुंबईची संस्था परप्रांतीय नाटकांचे अनुवाद करून मराठी रंगभूमीवर त्यांचे प्रयोग सादर करते. संस्थेचे प्रयोग केवळ भारतीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण कार्य करतात असे नव्हे; तर जुन्या साहित्य-चोरांना मुद्देमालासह पकडून देतात. तेही ध्यानीमनी नसताना.

याच संस्थेने 'कांचन रंग' नावाचे नाटक पुण्यास सादर केले. शंमू मित्र व अमित मैत्र यांचे हे मूळ नाटक. हेच नाटक दुसऱ्यांदा मराठी रंगभूमीवर आणले आहे मधुकर अमृते यांनी. दुसऱ्यांदा म्हणतो ते अशासाठी की, दत्ता कुलकर्णी यांनी लिहिलेल्या ' दैवे लाभला चिंतामणी ' मध्ये या नाटकाचा सरळ सरळ आधार घेतल्याचे आढळून येते. हं, आता हे मान्य की कुलकर्णी यांनी या नाटचवस्तूला खास मराठी रंगभूमीला बाबूराव गोखले आणि बाळ कोल्हटकरांनी दीर्घ परिचित करून दिलेला ' कौटुंबिक, सामाजिक, प्रापंचिक, घरंदाज नाटकाचा तोंडावळा ' यशस्वीरीत्या दिला आहे. पण सायकलची सफाईदार चोरी करून तिला काळयाची हिरवी करणे, आणि तांबड्या सीटऐवजी काळे सीट बसवून, सायकल माझीच म्हणून टेंभा मिरवणे, हा प्रकार जितका वाईट, तितकाच दुसऱ्याच्या कथावस्तूची चोरी करून, त्या साहित्यिक मालमत्तेवर हक्क सांगण्याचा प्रकारही अग्राह्य म्हणावा लागेल.

' दैवे लाभला चिंतामणी ' या श्री. कुलकर्णी यांच्या नाटकाचा विषय व ' कांचनरंग ' या नाटकाचा विषय एकच. कथावस्तूच्या मुख्य सूत्राशीही विलक्षण साम्य अशा परिस्थितीत श्री. दत्ता कुलकर्णी यांनी मूळ लेखकाचे ऋणनिर्देष केले असते तर ते वास्तव ठरले असते, परंतु उचल्यांचा भरपूर वावर असलेल्या चित्रपटसृष्टीत वावरत असल्याचा हा परिपाक असावा.

## पैसा–पैसा–पैसा

मानवी जीवनामध्ये पैशाला अन्यन्यसाधारण महत्त्व आहे. पैसा मिळाला की सर्व आले, आणि दैवाचे फासे उलटे पडून तोच पैसा गेला की सर्वस्व गेले. या विचारसूत्राभोवती 'कांचन-रंग'ची (अर्थात ' दैवे लाभला'चीही) कथा गुंफली आहे.

एक निवृत्त मध्यमवर्गीय बंगाली गृहस्थ आपल्या कुटुंबियांचे कष्ट कमी करण्यासाठी पत्नीच्या माहेर-गावाहून ' पांचू ' नावाच्या इसमास घरी आणतो. आश्रय दिल्याच्या दातृत्वाचा दबाव आणून घरातील सर्व माणसे त्याच्याकडून कष्टाची कामे करवून घेतात. अपवाद असते ती फक्त मोलकरीण तरला !

वाड्यातील एका इसमाकडून 'पाँचू' ला लॉटरीचे तिकिट मिळते. आणि बिचाऱ्याचे नशीब उघडून लाख रुपयांचे पहिले बक्षीस त्याला मिळते. कालपर्यंत क:पदार्थ असलेला 'पाँचू' घरातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती ठरतो. घरातील सर्व मंडळी सेवाभावाने त्याच्याभोवती गोळा होतात. 'पाँचू'विषयी विशेष भावना बाळगणाऱ्या तरलाला वाटते पाँचू आपल्याला विसरला. प्रसिद्ध झालेली पारितोषिकांची यादी पाँचूच्या नशिबाला अजून एक धक्का देते. अधिकृत यादीतून 'पाँचू'च्या तिकिटाचा क्रमांक गाळला जातो. घरामध्ये सर्वोत्तम स्थान लाभलेला पाँचू पुन: पूर्वस्थितीला जातो. मंडळी त्याला धक्के मारून घराबाहेर काढण्याच्या तयारीमध्ये असतानाच पाँचूलाच पारितोषिक मिळाल्याची तार येते.

आपले 'तकदीर' बरोबर घेऊन 'पाँचू' तरलेबरोबर घर सोडतो. दोन अंकी नाटक संपते. "पैसा आणि मानवी जीवनातील व्यक्तीचे स्थान यांतील संबंध हाच नाट्य वस्तूचा मुख्य विषय असल्याने लॉटरीच्या पारितोषिकासंबंधी दिलेले हेलकावे पुष्कळसे वास्तव वाटतात.

## निष्प्रभ प्रयोग

कुटुंबप्रमुख सकाळचा मॉर्निंग वॉक करून घरी आल्यावर आपल्या नोकराला (पाँचूला) विशिष्ट पद्धतीने सांगतो, "पाँचू अरे, जा संडास मोकळा आहे का बघ!" आणि काही काळ विधीनंतर त्या दिशेने गेलेल्या कुटुंबप्रमुखाला उद्देशून गृहस्वामिनी ओरडतात. "अहो झालं का तुमचं? चहा तयार आहे." ही बंगाली वास्तवता आम्हांला मानवणारी नाही. बरे, या वास्तवतेचा कथानकाशी मोठा सलग दुवा आहे असेही नाही. मग ही किळसवाणी वास्तवता हवी कशाला? का, डालडाचे भरलेले टमरेल घेऊन मंडळी एका विंगमधून दुसऱ्या विंगमध्ये जात नाहीत, हे आम्ही आमचे भाग्य समजायचे?

काही जुजबी दोष सोडले तर 'कांचन रंग'ची कथावस्तू समाधानकारक आहे. कसलेला नटवर्ग या नाटकास जास्त सरस यश संपादन करून देईल. सीमा (वैजयंती फाळके), माई (गांधारी राणे) व काहीप्रमाणांत पाँचू (दिवाकर जठार) यांचा अपवाद वगळता सर्व कलावंत अत्यंत सामान्य दर्जाचे होते. संवाद बोलण्याचा वकूब अनेक कलावंतांजवळ नव्हता.

बंगाली वातावरण निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न व अतिसामान्य निर्मितीमूल्ये यांमुळे प्रयोगाचा दर्जा अपेक्षेपेक्षा खाली आला.

परप्रांतीय विचारप्रणालीची चाहूल देणारे व मराठी नाटकाराचे चौर्यकर्म उघडकीस आणणारे नाटक या दोनच 'कांचन रंग' च्या बाबतीत रंगलेल्या बाबी

# कु. मायावतीचे

# संगीत मानापमान

तिसरी घंटा निनादते. धूपाचा मत्त दरवळ रंगमंदिरातील वातावरण मंगल व सुगंधित बनवीत असतानाच नांदीचे सूर कानी पडतात: "नम्रन नटवरा, विस्मयकारा–"

'हमीर' रागातील नमनाचे हे शब्द व सूर दूर दूर जाऊ लागतात आणि दुसऱ्याच क्षणी प्रकाशमान झालेल्या रंगमंचावर विविध व्यक्तिरेखा साकार होऊ लागतात.

## कथावस्तू फुलत नाही

वस्तुत: कै. खाडिलकरांचे 'मानापमान' नाटक रसिकांना काही नवे नाही. अगदी एकपात्री 'मानापमान'ही. मागे सौ. सुहासिनी मुळगावकरांनी 'एकपात्री मानापमान' सादर केले होतेच; तथापि 'सं. स्वयंवरा'इतके ते प्रेक्षकांना–निदान नव्या पिढीतील प्रेक्षकांना–तरी तितकेसे परिचित नाही. आणि दुर्दैवाने यातील अनेक 'कॅरेक्टर्स' कुमारी मायावतीला ठसठशीतपणे वठवता आलेल्या नाहीत. त्यामुळे मूळ नाटकातील कथावस्तू सहजगत्या फुलत नाही. निरनिराळ्या पात्रांचे प्रयोजन नीटपणे आकलन होत नाही व त्यामुळे मूळ कृतीवर अन्याय तर होतोच; शिवाय नाट्यप्रयोगही कंटाळवाणा होतो!

मानापमानाच्या कात्रीत सापडल्यामुळे दोन वेळा मोडलेले धैर्यधर व भामिनी यांचे लग्न खऱ्या प्रेमाचा पगडा मनावर बसून निरभिमानी बनलेल्या भामिनीच्या, चतुर लीनतेने अखेर, कसे घडून येते, याचा प्रेक्षकांना नीटसा बोध होत नाही! त्यातून एकपात्री रंगावृत्तीला सोयीस्कर म्हणून दिग्दर्शकांना काही प्रसंग, घटना प्रत्यक्ष रंगभूमीवर घडताना दाखवण्याऐवजी पडद्यातून केलेल्या निवेदनावर भागवावे लागले आहे!

भामिनी, धैर्यधर, बावा, लक्ष्मीधर, विनोद, अक्का इत्यादी विविध व्यक्तिरेखा साकार करताना स्वभावपरिपोषासाठी, प्रत्येक पात्रासाठी वेगवेगळी 'डिलिव्हरी स्टाइल', 'मुव्हमेंटस्' व 'पोजेस्' इत्यादी द्वारा त्या त्या व्यक्तीचे निराळेपण प्रेक्षकांच्या मनावर ठसविण्याचा आपल्यापरीने मायाने प्रामाणिक प्रयत्न केला आहे. तथापि भामिनीइतक्या इतर व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनाची पकड घेऊ शकत नाहीत व त्यामुळे कथानकाची संगती (Harmony) नीटपणे राखली जात नाही!

### रंगलेली पदे

मात्र कु. मायावतीची संगीताची तयारी बऱ्यापैकी आहे. अगदी सलामीलाच 'यमन कल्याण' मधील 'हा टकमक पाही सूर्य' हे पद रंगते. तशी तिची बहुतेक

पदे रंगतात. विशेषत:, ' मानापमान 'ची पूर्वसूरींनी गाजवलेली ' युवति मना ' ' माता दिसली ', ' दे हाता शरणागता ' ही पदे ती तन्मयतेने गाते.

' खमाज ' रागातील ' नाही मी बोलत नाथा, आता ' हे बाल गंधर्वांनी गाजवलेले पद माया पण चांगलेच रंगवते. त्या वेळच्या तिच्या आवाजातील लडिवाळपणा कानांना गोड गुदगुल्या करतो. तसेच लटका राग, डोळ्यांतील लटका खट्याळ भाव, माना वेळावण्यातील माधुर्य...हे गोड हावभाव फारच अप्रतिम. तद्वतच ' जिल्हा ' रागातील पुष्पमालेला उद्देशून असलेले ' सवतचि भासे मला ' ह्या पदाच्या वेळी तिने स्त्री-सुलभ मत्सराचा सुंदर व समर्थ आविष्कार साधला आहे. तसा प्रत्येक पदाचाच रसपरिपोष ती समर्थपणे साधते. गाण्याला अनुरूप असा माफक, पण मोहक अभिनयही करते. त्यामुळ पदाची मूळ रंगत अधिकच वाढते. अर्थात तिच्या या यशात बालगंधर्वांच्या कंपनीतील जुने जाणते संगीत–दिग्दर्शक हरिभाऊ देशपांडे व दिग्दर्शक पद्माकर देव यांचाही वाटा आहेच.

एकपात्री प्रयोगात पात्राप्रमाणे पोशाख बदलण्याची कल्पना रसभंग करणारी, अनवश्यकही. पोशाख बदलून होईपर्यंतचा वेळ रंगमंच रिकामा पडत होता व प्रेक्षकांचे अवधान विचलित होत होते. तसेच ' धिक्कार मन साहिना 'च्या वेळी माया आवेशाने मान हालवते तेव्हा तिच्या डोकीवरचा अगडबंब फेटा डोळ्यांवर घरंगळणे, ओठावरल्या मिशांकडे सारखा हात जाणे, वेषांतर करताना एका हातात कंकण तसेच राहून गेल्यामुळे तिसऱ्या अंकात प्रेक्षकांना धैर्यधराच्या उजव्या हातात कंकण दिसणे, असले भयंकर प्रकार घडतात !

## आता एकपात्री प्रयोग पुरे !

कु. मायावतीचा हा एकपात्री प्रयोग पाहताना पुन: एकवार मनात विचार येतो तो हा की, आता एकपात्री प्रयोगाची मराठी रंगभूमीवरील नवलाई संपलेली आहे. एकाच पात्राने अनेक भूमिकांचा आभास निर्माण करणे कलावंताच्या अभिनय–नैपुण्याचे अष्टपैलुत्व सिद्ध करण्यापुरते ठीक असले तरी त्याचा अतिरेक वाईटच. पुरुषांनी स्त्री–भूमिका करणे जितके अनैसर्गिक, तितकेच स्त्रियांनी एकपात्रीमध्ये पुरुषांची ' सोंगे ' काढणे अवास्तव !

परवाच ' माणूस 'मध्ये सौ. मीना पेठे यांच्या ' वासवदत्ता 'च्या निर्मितीमागील कथेत वाचले की, सौ. सुहासिनी मुळगावकर या नाटकाद्वारे प्रथमच ' टीम 'मध्ये काम करणार आहेत–बहुपात्री नाटकात दिसणार आहेत. सौ. मुळगावकरांकडून स्फूर्ती घेऊन मायावतीने ज्याप्रमाणे मराठी रंगभूमीवर संगीत एकपात्री नाट्यप्रयोग यशस्वीरीत्या सादर केले, तसेच त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आता एकपात्री-ऐवजी बहुपात्री नाटकांतून प्रेक्षकांना आपल्या अभिनय व संगीत-गुणांचे दर्शन घडविल्यास तिच्या चाहत्यांकडून त्याचे अधिक उत्साहाने स्वागत होऊ शकेल, असे मला तरी वाटते !

हिदायतखान ●

# काका मला वाचवा

## केवळ करमणूक

राजा परांजपे यांचं एक हिन्दी चित्र नुकतंच पाहिलं, 'आदर्श लोका'च्या बॅनरखाली तयार झालेलं "इश्क और खून" (लव्ह अॅन्ड मर्डर) हे चित्र आलं कधी आणि गेलं कधी याचा सुगावा लागला नाही तरी ज्या मराठी माणसांनी परांजप्यांचं म्हणून हे पिक्चर पाहिलं, त्या सर्वांना राजाभाऊंनी अक्षरशः साफ केलं.

प्रस्तावना अशासाठी की या पार्श्वभमीवर त्यांचा 'काका, मला वाचवा' हा नवीन मराठी बोलपट पाहण्याचं धाडस केलं. पुष्कळसा दिलासा मिळाला. मराठी चित्रपटांच्या हाताळणीमध्ये तरी राजाभाऊ त्यांचा स्पेशल हिन्दी टच् चटका बसण्याइतक्या तीव्रतेनें देत नाहीत हे भाग्य. विजय आणि दिनू हे जिवाभात्राचे मित्र. दिनू संसारी गृहस्थ, पत्नीच्या अमोघ वाणीने जायबंदी झालेला, विजय बेकार चित्रकार, परंतु आफ्रिकेतल्या काकांकडून १०० रुपयांचा मासिक तनखा मिळवण्यात यशस्वी झालेला तरुण। विजय (राजा गोसावी, वय वर्षे ४०–४२ च्या आसपास असावे.) या तरुणाची ती तरुणी समोर बंगल्यात राहत असते. या सापत्य विधवेच्या छोटया छोकरीवर विजयचा जीव. बरं, आईचं वय व रूप बघून विजयला या छोकरीबद्दल मायेचे भरते येते. गाडीची धाव कोणत्या स्थानकाकडे आहे, याची दिनूला कल्पना येते. या पवित्र कार्यात विजयला साथ देण्याची साहाय्यकारी भूमिका दिनू आस्थेने स्वीकारतो.

दिनूच्या पत्नीला हा उपद्व्याप व विजयचे घरातील अस्तित्व पसंत पडत नाही स्त्रीप्रधान कुटुंब पद्धतीमुळे विजयला घराबाहेर पडावे लागते. या वेळेपर्यन्त आघाडीवरील परिस्थिती मजबूत झाली असल्याने चाळीतून बाहेर पडलेला विजय थेट कमलच्या (बालविधवा उमा) बंगल्यात येतो. गुंतागुंत वाढतच राहते. आफ्रिकेतील काकाकडून विजयचा मासिक हप्ता वाढवून मिळावा म्हणून दिनूने केलेली खटपट अंगाशी येते. नको असलेला दिवस येतो. आफ्रिकेतला काका घरात येतो. पूर्ण शरणागती पत्करण्याखेरीच मार्ग नाही, अशी विजयची खात्री होते. शरणागतांना अभय देणाऱ्या भारतीय उज्ज्वल परंपरेशी आफ्रिकन काका–राजा परांजपे–इमान राखतात. विजय-कमलचे मीलन होते. प्रेक्षकांना घरी पोचवण्याची कामगिरी दिनू पार पाडतो.

शुद्ध करमणूक करण्याच्या हेतूने चित्र-निर्मिती करण्यात आली आहे. हा हेतू पुष्कळशा प्रमाणात साध्य झाला आहे. गेल्या काही दिवसांतील अत्यंत गचाळ

सामाजिक चित्रपट, आणि नृत्यझंकार व ढोलकी तुणतुण्यात न्हाऊन निघालेले तमाशापट यांचा वीट आल्यामुळे कदाचित् हा चित्रपट त्याच्या वास्तव योग्यतेपेक्षा सरस वाटण्याचा दाट संभव आहे.

चित्रपटाच्या कथाभागामध्ये विजय व कमल यांच्या संबंधांची हाताळणी हा अत्यंत महत्त्वाचा भाग. एक संपन्न, सुंदर बालविधवा एका गचाळ, परंतु मनाने चांगल्या असलेल्या चित्रकाराच्या प्रेमात पडते. याची मांडणी कथा स्वरूपात करणे हा अलग भाग. आणि हीच कल्पना चित्ररूपाने ती वास्तव वाटेल अशा प्रकारे साकार करणे हा अत्यंत कठिण भाग. राजा परांजपे यशस्वी झाले आहेत ते याच बाबतीत. आपल्या एकुलत्या एक मुलीचा चाहता म्हणून विजयबद्दल नकळत निर्माण झालेली आस्था, त्यातून निर्माण झालेली आपुलकी व अव्यक्त प्रेम, या सर्व भावछटा परांजप्यांनी या दोघांना जवळ आणताना मोठ्या कौशल्याने दाखवल्या आहेत. विजय-कमल या दोन व्यक्तिरेखांची निकोप वाढ हा या चित्राचा विशेष म्हटल्यास वावगे ठरू नये.

## चित्रपट ‘ उमाचा ’

दिनू-विजय मैत्री ठराविक साच्यातून जाते. दिनू, दिनूची बायको यांना चित्रात जागा कमी. बायको नावाची ही बाई वेडी-विडी आहे की काय, अशी शंका मनात येते, पण नाही;–तो बाईच्या अभिनयाचा भाग आहे. ‘गुरुकिल्ली’ प्रसिद्ध सुषमाला धांगडधिंगा घालण्यास भरपूर वाव आहे. कमलचा पहिला पती व्यसनी असल्याची माहिती प्रेक्षकांना देणे, विजयला काही काळ कमलपासून दूर नेण्याचा सक्तीचा प्रयत्न करणे व गुंतागुंत पुरेशी वाढवून कथानकातून पोबारा करणे इतकी कामगिरी बाई बजावतात.

राजा गोसावींचा ‘ विजय ’ निराशाजनक आहे. श्रीकांत मोघे राजा गोसावींची भ्रष्ट नक्कल करण्यात आनंद का मानतात समजत नाही. राजा परांजपे यांचा आफ्रिकन काका बेतास बातच आहे. चित्रपट सर्वार्थाने कमलचा—उमाचा— आहे. कमलच्या सर्व भावनांचा आविष्कार तिने लीलया केला आहे. गाण्यांच्या वेळी विशेषतः दुसऱ्या (सा रे ग म कथा)—बाई किंचित कॉन्शस असाव्यात. श्री. दत्ता गोर्ले यांनी बाईंचे सौंदर्य व अभिनयकौशल्य चांगल्या प्रकारे टिपले आहे.

सर्वसाधारण चित्रपटांपेक्षा गाणी वेगळी व म्हणूनच आकर्षक वाटतात. ‘इटुकलं पिटुकलं,’ व ‘ सा रे ग म ’ ची संगीत कथा, या गीतांचा ह्या संदर्भात उल्लेख करावा लागेल. दत्ता डावजेकरांनी दोन्ही गीते चांगली संगीतबद्ध केली आहेत.

ध्वनी—संयोजन, संकलन, कला दिग्दर्शन, छायाचित्रण व निर्मितीची अन्य शुद्ध तांत्रिक अंगे हा मराठी चित्रपटांचा ‘ खास कच्चा दुवा ’ आहे. त्याच्या वाटेला जाऊ नये, हेच चांगले.

# राज खोसला यांची कारागिरी

# अनिता

मानवाला पुनर्जन्म आहे काय ? असलाच तर त्याला गतजन्मीच्या स्मृती असतात काय ? सामान्य माणूस याबाबत नेहमीच द्विधा मनःस्थितीत असतो. त्याला कधी असेही वाटते तर कधी तसेही. तो चित्रविचित्र बातम्या वाचतो वा अशा बातम्या त्याच्या कानी पडतात व त्याचा विश्वास बसतो; पण भोवतालची सत्य परिस्थितीही त्याला दिसत असते. त्यामुळे तो साशंकही होतो. सामान्य माणसाच्या या अनिश्चित मनाचा फायदा घेऊन राज खोसला यांनी 'अनिता'ला जन्म दिला आहे व चित्रपटाच्या नायकाला आणि प्रेक्षकांना दोन-अडीच तास चांगलेच बुचकळ्यात ठेवले आहे.

'अनिता' चित्रपटात रूढार्थाने सस्पेन्स नाही; पण नायिकेची बहुविध स्त्री-रूपे प्रेक्षकाला गोंधळात पाडतात व अखेरीस ही खरी आहे तरी कोण याविषयी त्याच्या मनास कुतूहल वाटत राहते. मध्यंतरी एक-दोनदा हा चित्रपटही इतर अनेक रहस्य-पटांप्रमाणे नायिकेच्या डबल रोलवर आधारित असणार असे वाटू लागते, पण तसे नाही.

'अनिता'मध्ये खलनायकाची टोळी वगैरे नाही. खलनायक नायिकेला व तिच्या बापालाच आपल्या हातचे बाहुले बनवितो व नायकाने नायिकेचा पिच्छा सोडावा म्हणून डाव टाकतो. त्याच्या या योजनेनुसार नायिकेभोवती एक रहस्यमय वर्तुळ निर्माण केले आहे. चित्रपटाच्या अखेरीअखेरीस स्वतः खलनायकच या वर्तुळाचा भेद करतो व सर्व उलगडा होतो. छोटचाशा मारामारीनंतर चित्रपट संपतो.

सी. आय. डी.पासून राज खोसला यांनी अनेक रहस्य-चित्रपट हिंदी पडद्यावर सादर केले आहेत. 'फिनिश्ड' चित्रपट हे त्यांचे वैशिष्टच आहे. 'अनिता'-मध्येही तीच गोष्ट नजरेस येते. सबंध चित्रपट-पहिले काही ढिले प्रसंग वगळता-खोसला यांच्या कुशल कारागिरीने नेटका बनला आहे. अनिता चित्रपटात खोसला यांच्या हातून ढिला राहिलेला धागा म्हणजे डिटेक्टिव्हची विनोदी पात्रे ही अत्यंत पोरकट वाटतात. रहस्यमय चित्रपटात डिटेक्टिव्हचे पात्र विनोदी दाखवायचे हेच एक मोठे धाडस आहे आणि त्यात नायक त्यांच्या आहारी जातो हे म्हणणे फारच बुद्धीपलीकडचे होते.

# चित्रपट

खोसला यांनी 'अनिता'मध्ये वापरलेले वेधक तंत्र म्हणजे नायिकेच्या वेगवेगळ्या रूपांची वेगवेगळ्या व्यक्तींद्वारा ओळख करून द्यावयाची व तिच्याबाबतच्या रहस्याचा गुंता वाढवत ठेवायचा. अशा तऱ्हेने चित्रकार तिचे स्वैराचार रूप दाखवितो; खलनायक तिच्या पूर्वजन्माविषयीच काही तरी विचित्र सांगतो, तर प्रत्यक्षात ती नायकाला भेटते जोगिणीच्या वेषात. या सर्व गोष्टींमुळे प्रेक्षक खऱ्या 'अनिता'विषयी सदैव बुचकळ्यात पडलेलाच राहतो.

'अनिता'च्या कथेची मूळ कल्पना स्वत: श्री. राज खोसला यांची आहे. पटकथा व संवाद श्री. ग. रा. कामथ यांचे आहेत. संवाद काही ठिकाणी चमकदार आहेत. नवचित्रकलेबाबत मराठीत जे अनेक विनोद आहेत त्यातलेच दोन आय. एस. जोहरच्या तोंडून या चित्रपटात वदविले आहेत.

## बऱ्यापैकी अभिनय

खोसला यांच्या कारागिरीइतकीच या चित्रपटातील महत्त्वाची बाजू म्हणजे मनोजकुमारचे काम. स्वत:च्या प्रेयसीविषयी जसजशा नवनवीन वाईटसाईट गोष्टी त्याला कळत जातात तसतसा गोंधळून जाणारा त्याचा चेहरा खूपच बेमालूम बनला आहे. त्याने फारशा स्टाईल मारल्या नाहीत. तरीसुद्धा प्रेमात हरवलेला असाच चेहरा दिसतो. साधना फारच रुटिन वाटते. तिच्यातली मोहकता खूपच कमी झाल्यासारखी दिसते.

लक्ष्मीकांत–प्यारेलाल यांनी मुकेशच्या दोन गाण्यांना दिलेल्या चालीमध्ये अतिशय गोडवा आहे. मुकेशच्या संथ, धीरगंभीर आवाजात म्हटलेली ही गाणी बराच काळ कानांत साठून राहतील, अशी आहेत. इंग्लिश जंगली चित्रपटांना असते तशा प्रकारचे संगीत त्यांनी पार्श्वसंगीतासाठी वापरले आहे तेही चित्रपटाचे रहस्यमय वातावरण वाढविणारे ठरते.

'अनिता' चित्रपट आहे सामान्यच; पण राज खोसला यांचा त्यावरून फिरलेला सफाईदार हात, मनोजकुमारचे काम व चित्रपटाचा असलेला वेग यांमुळे दोन-अडीच तास भर्रकन निघून जातात. बऱ्यापैकी विरंगुळा मिळाल्यासारखे वाटले.

●

# तुमचे भविष्य आमचा अंदाज




**श्री. गो. जोशी**

सायनाचार्य, नासिक


## माहे मे १९६७चे राशिभविष्य

**मेष** : तुमच्या कित्येक दिवसांच्या विवंचना या मे महिन्यात मिटणार आहेत. अनिष्ट मंगळाचा हृदयपालट झाल्यासारखे जाणवेल. साडेसातीच्या शनीचीही वैचारिक क्रान्ती झाल्यासारखी वाटेल. आता सहसा हे अनिष्ट ग्रह तुमच्या वाटेस जाणार नाहीत आणि म्हणूनच तुमची स्थगित प्रगती गतिमान बनू लागेल.

दुसऱ्या पंधरवडयात शैक्षणिक यश मिळेल. अनेक व्यावसायिक पेचप्रसंग सोडविण्यात यशस्वी व्हाल. अनेक वेळा दूरचे प्रवास घडतील. दि. २२–२३ पासून तर दाही दिशा तुमच्या कर्तृत्वाला मोकळया दिसू लागतील. नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील. राजकीय क्षेत्रात प्रतिष्ठेचे स्थान लाभेल. वैचारिक मतभेद मिटून विरोधकांशी दिलजमाई होईल.

दि. ३ ते ७, १५ ते १९, २५ ते ३१ या कालाचे महत्त्व विशेष जाणवेल.

**वृषभ** : तुमच्या कार्यक्षेत्रात प्रचंड उत्क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य या मे महिन्यातील ग्रहस्थितीमध्ये निश्चित आहे. दि. ११ चा सूर्य-गुरू लाभयोग हे दोन योगही तुमच्या बऱ्याचशा अपेक्षा सफल करण्यास समर्थ ठरतील. मेचा दुसरा पंधरवड़ा हाच तुमच्या उज्ज्वल यशाचा केंद्रबिंदू. पण ते यश पदरी पाडून

घेण्यासाठी आपले सारे कर्तृत्व पणास लावावे लागेल, निर्धाराचे खड्ग हाती धरावे लागेल.

स्थावराची— राहत्या जागेची विवंचना मिटेल. मंगलकार्याचा प्रश्न सुटेल. सांपत्तिक स्थिती अपेक्षेबाहेर सुधारू लागेल. याच महिन्यात स्थानांतरही घडावे.

दि. ४ ते ५, १५ ते २३, २६ ते ३१ अनेक संस्मरणीय घटना घडाव्यात.

**मिथुन** : या वेळची तुमची ग्रहरचना पाहिल्यानंतर असे म्हणावेसे वाटते की, या मे महिन्याच्या मध्यकाली तुमच्या प्रगतीला उधाण येईल. भाग्याला तुफान होईल. या महिन्यात अनेक ग्रह लाभस्थानी जमलेले आहेत. त्यांचीच ही किमया. प्रामुख्याने दि. ११ चा रवि–हर्षल त्रिकोण अनपेक्षितपणे उत्तुंग यश देऊन जाईल, तर दि. २१ रवि-गुरू लाभयोग तुमच्या उरल्यासुरलेल्या साऱ्या आशाआकांक्षा पूर्णांशाने सफल करील. गेल्या कित्येक महिन्यांत इतका चांगला काल आपण अनुभवलेला नसेल.

पण चौथा मंगळ सुरू आहे. हे लाभणारे यश, मिळणारा लाभ सहजासहजी पदरी पडणार नाही. प्रयत्नांची शिकस्त करावी लागेल. रान उठवावे लागेल एकच समाधान की या साऱ्या परिश्रमाचे श्रेय मिळल्याशिवाय राहणार नाही.

दि. ३ ते ९, ११ ते १३, २१ ते २८ या कालात अनंत प्रगत घटना घडतील.

**कर्क** : पक्षांतर करण्याची साथ ग्रहांमध्येही पसरलेली दिसते. तुळेतील मंगळाने काही काल कन्या राशीशी हातमिळवणी केल्याने कन्याराशीपक्ष अधिक बलवान झाला आहे. आणि या पक्षांतरामुळे कर्क राशीच्या व्यक्तींना या महिन्यात निर्णायक बहुमत व यश मिळू लागेल.

या महिन्यातील दुसरा पंधरवडा आपणास अपेक्षासाफल्याचा जाणवेल. जागेचा प्रश्न सुटेल, खर्चाचा लोंढा थोपविता येईल, नवे व्यवसायक्षेत्र उभारले जाईल. नोकरीधंद्यात हेका धरण्यासारखी प्रगती होईल. नाट्य संगीत क्षेत्रातही तुमचे सर्वत्र स्वागत घडेल. नव्या बढतीचे योग दि. २१ नंतर दृष्टिक्षेपात यायला लागतील.

दि. ४ ते १३, १८ ते २५, २९–३० या कालात अनेक लाभदायक घटना घडाव्यात.

**सिंह** : मंगळाचे राश्यंतर घडलेले आहे, सूर्य–बुधही लवकरच तोच कित्ता गिरविणार आहेत. या बहुसंख्य ग्रहांच्या पक्षांतरामुळे अंतरीक्षीय राजकीय वातावरणात मोठा पेचप्रसंग निर्माण होऊ लागलेला आहे. सिंहराशी व्यक्तींवरही या गटबाजीचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ?

या महिन्यात तुमचे अंदाजपत्रक साफ चुकेल. अडीअडचणींशी धैर्याने झगडावे लागेल. पहिला पंधरवडा पुष्कळसा अनुकूल आहे. दि. ११ चा सूर्य–हर्षल त्रिकोण अनपेक्षितपणे प्रगतीच्या घटना घडवून आणील. पण दुसरा पंधरवडा बराच धकाधकीचा, अडीअडचणींचा जाणवू लागेल. दि. २१ ला सूर्य-गुरू शुभ योगामुळे सर्व पेच सुटू लागतील.

दि. ८ ते १३, २१ ते २५ या काळी अनेक लाभदायक, प्रगतिकारक गोष्टी घडाव्यात.

**कन्या :** एक मंगळ सोडून दिला तर बाकी सारे ग्रह तुमच्या पाठीशी उभे आहेत. ते मंगळाचे डावपेच उधळून लावतील. विरोधकाला दाती तृण धरायला लावतील. दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य भाग्यस्थानी प्रवेश करताच सारे कालचक्र अनुकूल फिरू लागेल. सूर्य-गुरू लाभयोगाच्या आसपास (दि. २१) आपल्या अनेक समस्या भराभर सुटायला लागतील. नोकरीधंद्यातील हुकलेल्या संधी पुन्हा लाभतील. प्रतिष्ठेच्या स्थानावर बढती होईल; अकराव्या गुरूच्या अचाट सामर्थ्याचा त्याच वेळी आपणांस प्रत्यय यावा.

दुसऱ्या पंधरवड्यात दूरचा प्रवास घडेल. मंगलकार्याचे एकाएकी ठरेल. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. परदेशी जाण्याचे भाग्यही काही लोकांना लाभेल.

दि. ५ ते १२, २१ ते ३० या काळात अनेक प्रगत घटना घडाव्यात.

**तूळ :** या वेळी इष्टानिष्ट ग्रहयोगांची खूपच गल्लत झालेली असल्याने, अनेक प्रगत घटना घडतील. तशाच काही क्लेशदायक प्रसंगालाही तोंड द्यावे लागेल.

सांपत्तिक ताण पहिल्या पंधरवड्यात कमालीचा जाणवेल. विरोधक तुमच्या मार्गात काटे पसरवण्याचा प्रयत्न करतील. दुसरा पंधरवडा सुरू होताच सर्व कालचक्र अनुकूल फिरू लागेल. लाभस्थानच्या हर्षलाशी गुरु-सूर्याचा लाभयोग होणे अशी घटना क्वचित घडते. आणि ती अनन्यसाधारण लाभ देऊन जाते. जे कधी स्वप्नातही नव्हते, असे काही भव्यदिव्य या वेळी घडून जाईल. गेल्या महिनाभरातील भंगलेल्या साऱ्या आकांक्षा बेमालूमपणे सांधल्या जातील. तुमच्या कर्तृत्वाला दाहीदिशा मोकळ्या दिसतील.

दि. ११ ते १५, २१ ते २९ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**वृश्चिक :** या महिन्यापासून मंगळ, गुरु-हर्षल अनेक समर्थ ग्रह तुमच्या पाठीशी उभे आहेत. तुमच्या प्रत्येक कार्याला त्यांचे हार्दिक सहकार्य लाभेल. निर्मळ यश पदरी पडेल.

मागे राहणे, कच खाणे असले विचार डोक्यातून निघून जातील. आणि प्रत्येक पाऊल आत्मविश्वासाने पुढे पडेल. भाग्यस्थ गुरूशी सूर्याचा शुभयोग एवढी एक ग्रहस्थितीही नेत्रदीपक यश मिळवून द्यायला समर्थ ठरेल.

मंगलकार्याचा प्रश्न सुटेल, स्थावराची समस्या सोडविली जाईल आणि दि. २६ रोजी मंगळ मार्गी होताच नजीकचा भविष्यकाल उज्ज्वल असल्याची खात्री पटेल.

दि. ११ ते १६, २१ ते २९ या काळी आपल्या अपेक्षेप्रमाणे सारे काही घडेल.

**धनू :** मंगळ दशमात आणि तो गुरूशी शुभ योग करणारा. तुमच्या कर्तुत्वाला धार चढेल, चारित्र्याला उत्थान मिळेल. चौथा शनी आणि आठवा गुरू यांची दखल घ्यायचीही गरज भासणार नाही.

इतरांपेक्षा काही वेगळे करून दाखवण्याची तुमची धडपड या वेळी कारणी लागेल इष्टमित्रांचे सहकार्य सतत लाभू लागेल आणि त्यामुळेच तुमची सारी कामे गती घेऊ लागतील. आगामी २–३ महिन्यांत तरी आपणांस अनिष्ट काल आहे हे आपण विसरू शकता.

वैचारिक संघर्ष मिटतील, मनावरील नैराश्याची सारी जळमटे झटकली जातील.

दि. ९ ते १३, २० ते २५, २८ ते ३१ अनेक कामे गती घेऊ लागतील.

**मकर :** गुरू, मंगळ, सूर्य—अंतरिक्षातील साऱ्याच ग्रहांची बैठक अशी आहे की हा महिना तुमच्या जीवनात चिरंतन स्मृतीचा ठरावा. पहिल्या पंधरवडचाबद्दल फारशी अपेक्षा बाळगू नका. दुसरा पंधरवडा सुरू होताच ईश्वर आपल्या पाठीशी उभा असल्याचा सदैव साक्षात्कार घडेल. सहज काही करावे आणि ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठावे, असा प्रत्यय यायला लागेल. साहित्य—कला—शास्त्र या क्षेत्रांत दिगंत कीर्ती मिळेल, व्यवसायधंद्यात तर हेवा करावा असे यश लाभेल.

नव्या चाकोरीतून जीवन जाऊ लागेल, उत्क्रांतीकडे पावले पडू लागतील.

दि. ११ ते १४, १९ ते २३, २६ ते २९ या काळी अनेक यशस्वी घटना घडू लागतील.

**कुंभ :** मंगळ अष्टमात आल्याने थोडेफार खटकल्यासारखे जाणवेल, पण सूर्य—राहू पराक्रमात आहेत ते सहसा तुम्हांला कसलीही उणीव भासू देणार नाहीत. कर्केचा गुरुही आपले सारे सामर्थ्य पणास लावून तुमची सांपत्तिक बाजू भरभक्कम करण्याचा प्रयत्न करील. या वेळी तरी निदान आपण आपली साडेसाती विसरू शकता. यशस्वी जीवनाचा नवा मंत्र आपण शिकू शकाल. आणि त्याच्या सामर्थ्यावर अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही तुम्ही सहज शक्य करून दाखवाल.

या वेळी स्थानांतर घडून येण्याची शक्यता—नवे कार्यक्षेत्र हाती येईल. आणि आपले भविष्य तिथेच रुजू लागेल.


दि. ४ ते ११, १५ ते २१, २४ ते २७ हा काल नोंद करा.

**मीन :** शनि-मंगळांनी विद्ध झालेली तुमची राशी मे. महिन्याच्या पहिल्या पंधरवडचात तरी काही आशादायक वातावरण निर्माण होईल अशी आशा करण्याला जागा नाही. त्याच विवंचना त्याच अडचणी.

दुसऱ्या पंधरवडचापासून काहीसे आशादायक वातावरण सर्वत्र दिसायला लागेल. नव्या जोमाने—नव्या तंत्रमंत्रांचा अंगीकार करून कार्यक्षेत्रात उतराल. आरोग्य सुधारेल, स्नेहसंबंध दृढ होऊ लागतील. आणि मंगल कार्यांचे ठरेल.

प्रामुख्याने दि. २१ पासून आपली प्रगती गती घेऊ लागेल. साहित्याच्या क्षेत्रात, यांत्रिक व्यवहारात अपेक्षेबाहेर यश मिळवाल. येथूनच तुमच्या साफल्याचा काळ सुरू होऊ लागेल.

दि. १ ते ७, १० ते १५, २१ ते २९ या कालावर लक्ष केंद्रित करा. ●



लोकमान्य आणि
राजमान्य ग्रंथाची
चतुर्थ आवृत्ती

# राजा शिव छत्रपति

ब. मो. पुरंदरे

- रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे
- सुबक मुद्रण
- टिकाऊ बांधणी
- दलालांची आकर्षक चित्रे.
- ऐतिहासिक वास्तूंची दुर्मिळ छायाचित्रे.

४० रुपये
किमान

**१०० रुपयांची ठेव**
**६ वर्षांसाठी**

'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सुमारे सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा ग्रंथ प्रसिद्धीनंतर ताबडतोब विनामूल्य घरपोच मिळेल.

- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे आपली ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.

- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.

- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी.


# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

## एक आकर्षक संधी

राजहंस प्रकाशन
पुणे

८१९ नारायण, पुणे




राजहंस प्रकाशन संस्थच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पूणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**